रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १२९। पृष्ठे ८+४ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५

किंमत ४ ₹

## जिल्ह्याला परतीच्या पावसाने झोडपले

**अलिबाग :** हवामान विभागाने १५ ऑक्टोबरपासून जोरदार पाऊस पडणार असा इशारा दिला होता. त्यानुसार रायगड जिल्ह्यात बुधवारी सायंकाळपासून अनेक तालुक्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी भातकापणीचे कामे हाती घेतली असून, काहींनी पीक कापून शेतात ठेवले आहे. शेतीमध्ये पाणी साचून राहिल्याने भातपिकाला धोका निर्माण झाला असून, शेतकरी चिंतेत सापडला आहे. अचानक आलेल्या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली. दिवाळी सण काही दिवसांवर येऊन ठेपल्याने अनेकजण बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी बाहेर पडले होते. परंतु, पावसामुळे सर्वांचा हिरमोड झाला असून, आनंदावर पाणी पडले आहे.

## महाभारतातील 'कर्ण' काळाच्या पडद्याआड

**मुंबई :** अभिनेते पंकज धीर यांचे निधन झाले आहे. ते ६८ वर्षांचे होते. ते बऱ्याच काळ कॅन्सरशी झुंज देत होते. त्यांचा कॅन्सर एक



वेळ उपचारानंतर पुन्हा उलटून आला होता. तेव्हा-पासून त्यांची प्रकृती बरी नसल्याचे समोर आले होते. पंकज यांनी अनेक सिनेमे आणि मालिकांमध्ये अभिनयाची छाप सोडली. पण, बी.आर. चोप्रा यांच्या महाभारतमधील कर्णाची भूमिका विशेष गाजली. याशिवाय चंद्रकांता, द ग्रेट मराठा या शोचादेखील समावेश होता. याशिवाय बादशहा, सडक आणि सोल्जर या सिनेमातही त्यांनी काम केले होते. पंकज यांच्या पश्चात मुलगा निकीतन आणि पत्नी अनिता असा परिवार आहे.

# अन्यथा निवडणुका घेऊ देणार नाही

## महाविकास आघाडीचा निवडणूक आयोगाला इशारा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सदोष व दुबार नावे असलेली मतदार यादी दुरुस्त करा, अशी आग्रही मागणी महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने केली. मतदार याद्या दुरुस्त होत नाही, तोपर्यंत निवडणुका घेऊ नका, अन्यथा निवडणुकीला विरोध असेल, असा इशारा महाविकास आघाडीने निवडणूक आयोगाला दिला. राज्यातील प्रमुख विरोधी पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी बुधवारी (दि.१५) पुन्हा एकदा राज्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन मतदार यादी आणि बोगस नावावरुन आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने विविध मुद्द्यांवर संवाद साधला. त्यानंतर, या सर्वच पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी पत्रकार परिषद घेऊन निवडणूक आयोगाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

### इलेक्शनपेक्षा थेट सिलेक्शन करुन मोकळे व्हा : उद्धव ठाकरे

**आम्ही सर्व जण लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी एकत्र आलो आहोत. भाजपला निमंत्रण दिले आहे, पण ते आले नाहीत. मतदार याद्यांमध्येच घोळ आहे. या याद्या आम्ही घरी छापलेल्या नाहीत. लोकशाहीचा खेळ मांडला आहे. त्यामुळे इलेक्शनपेक्षा थेट सिलेक्शन करुन मोकळे व्हा, असा टोला लगावत आता मतदार यादीतील घोळ संपेपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊ नका, अशी मागणी निवडणूक आयोगाकडे केली असल्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी सांगितले.**

### मतदार यादीत कुठलीही दुरुस्ती नाही : थोरात

**निवडणूक आयोग सीईओ यांना आम्ही काल भेटलो, आज आयुक्तांना भेटलो. आम्ही आधीच सांगितलं होत की, मतदार याद्यांमध्ये दोष आहे. दोष असताना सुद्धा निवडणूक घेतली गेली, बाहेरून मतदार आले आणि मतदान केलं. विधानसभेच्या मतदार यादीमध्ये दोष होते. १ जुलै रोजी मतदार यादी राज्य निवडणूक आयोगाने अंतिम केली, त्यामध्ये कुठलीही दुरुस्ती केली नाही. दोषासह ही यादी आता अंतिम केली, यावर राज्य निवडणूक आयोग आणि केंद्रीय निवडणूक आयोग यांना भेटलो. मात्र, आम्ही जे विचारले त्यावरील उत्तराने आमचं समाधान झालेलं नाही, असे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटलं.**



> **सदोष मतदार याद्यांबाबत निवडणूक आयोग यांच्यासोबत बैठक झाली. या बैठकीत चर्चा झाली असून, प्राधान्याने सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन आयोगाकडून देण्यात आले आहे.**
>
> **– जयंत पाटील, सरचिटणीस, शेकाप**

रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रात सदोष व दुबार नावे असलेल्या मतदारयाद्यांच्या प्रश्नांबाबत महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाची बैठक निवडणूक निवडणूक आयोगासमवेत बुधवारी (दि.१५) मुंबईत झाली. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे, मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, माजी आ. बाळाराम पाटील, शिवसेना नेते संजय राऊत, अनिल देसाई, आदित्य ठाकरे, अनिल परब, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते जयंत पाटील, शशिकांत शिंदे, जितेंद्र आव्हाड, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, वर्षा गायकवाड, प्रकाश रेड्डी, डॉ. अजित नवले, शैलेंद्र कांबळे, मनसेचे नेते बाळा नांदगावकर, संदीप देशपांडे, नितीन सरदेसाई आदी राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस, शेकाप, मनसे, पान २ वर

### ..तोपर्यंत निवडणुका घेऊ नका : राज ठाकरे

पाच वर्षे निवडणुका झालेल्या नाहीत, आता आणखी सहा महिने त्या झाल्या नाहीत तर काय फरक पडतो? मतदार याद्यांमध्ये सुधारणा होत नाही, तोपर्यंत निवडणुका घेऊ नका, अशी भूमिका राज ठाकरे यांनी मांडली. काल आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगांच्या प्रतिनिधींना भेटलो. आज राज्य आणि केंद्री निवडणूक आयगाच्या प्रतिनिधींना भेटलो. निवडणूक म्हटलं की, राजकीय पक्ष आले, मतदार आले. निवडणूक आयोग हे फक्त निवडणूक घेतात, मात्र राजकीय पक्ष ते लढवतात. मात्र, राजकीय पक्षांना निवडणूक आयोग याद्या दाखवत नसेल, तर इकडे घोळ आहे, असं राज ठाकरे म्हणाले. २०२४ नंतर यादी जाहीर केली, यात नावं आहेत, फोटो नाही. दोघांना भेटलो, हे आमच्यात येत नाही, असं सांगतात. मतदार याद्या न दाखवून काय भेटणार आहे? या मतदार याद्यांमध्ये सुधारणा होत नाही तोपर्यंत निवडणुका घेऊ नका, असं राज ठाकरेंनी सांगितले. पाच वर्षे निवडणुका झाल्या नाहीत, आणखी सहा महिने नाही झाल्या, तर काय फरक पडतो. उद्या-परवामध्ये काय निर्णय घेतात ते पाहू, नंतर सर्व आम्ही आमचा निर्णय सांगू, असं राज ठाकरेंनी स्पष्ट केलं.

## वेधक

### भाजपची दुसरी याची जाहीर

**नवी दिल्ली :** बिहार विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने १२ उमेदवारांची दुसरी यादी बुधवारी (दि. १५) जाहीर केली आहे. पक्षाने लोकप्रिय गायिका मैथिली ठाकूर यांनाही उमेदवारी दिली आहे. त्या मंगळवारी (दि. १४) भाजपमध्ये दाखल झाल्या होत्या. भाजपच्या दुसऱ्या यादीत अनेक जुन्या उमेदवारांचे तिकीट कापण्यात आले असून, काही नव्या चेहऱ्यांवर पक्षाने संधी दिली आहे. भाजपने गायिका मैथिली ठाकूर यांना अलीपूर मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. माजी आयपीएस अधिकारी आनंद मिश्रा यांना पक्षाने बक्सरमधून तिकीट दिले आहे. बाढ मतदारसंघातून ज्ञानेंद्र ज्ञानू यांचे तिकीट कापण्यात आले असून, त्याऐवजी डॉ. सियाराम सिंह यांना तिकीट दिले आहे.

### ६१ माओवाद्यांचे आत्मसमर्पण

**नवी दिल्ली :** गडचिरोलीत माओवाद्यांचा मोठा नेता असलेल्या सोनू उर्फ भूपती याच्यासह ६१ जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. मुख्यमंत्री फडणवी यांच्या उपस्थितीत या आत्मसमर्पणाचा कार्यक्रम पार पडला. सोनू उर्फ भूपती हा संपूर्ण दंडकारण्यात जो माओवादाचा उदय झाला, अहेरी दलम, सिरोंचा दलम, चामोर्ची दलम असेल किंवा टिपागड दलम जे तयार झाले, त्यातून शस्त्रे तयार झाली त्याचा सूत्रधार, आधार हा भूपती होता. आज त्याच्या आत्मसमर्पणामुळे आधारच संपला आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

### शेअर बाजारातील घसरण थांबली

**मुंबई :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लादलेल्या १०० टक्के टॅरिफच्या घोषणेनंतर अमेरिका-चीन याच्यातील व्यापार युद्ध तीव्र झाले आहे. त्याचा तणाव शेअर बाजारातही जाणवत आहे. या टॅरिफ आणि व्यापार युद्धाच्या धास्तीन गेल्या दोन दिवसांपासून सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये सतत घसरण होत होती. मात्र, बुधवारी बाजार सुरू होताच ही घसरण थांबल्याचे दिसून आले. बाजार उघडताच, मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्समध्ये ३०० पेक्षा जास्त अंकांनी वाढ झाली, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीतही १०० पेक्षा जास्त अंकांनी वाढ झाली. या आठवड्यात दोन दिवस सातत्याने घसरण होत होती. मात्र, बुधवारी ही घसरण थांबली आहे.

## रोह्यात स्मार्ट मीटरविरोधात जनआक्रोश

### सर्वपक्षीयांची महावितरण कार्यालयावर धडक

**। रोहा । प्रतिनिधी ।**

स्मार्ट प्रीपेड मीटरविरोधात सर्वहार जन आंदोलन व महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांनी रोहा महावितरण कार्यालयावर बुधवारी (दि.१५) जनआक्रोश धडक मोर्चा काढला. हा मोर्चा रोहा रायकर पार्क ते महावितरण कार्यालयावर नेण्यात आला. यावेळी आंदोलनकर्ते चांगलेच आक्रमक झाले होते.

'महावितरणचा निषेध असो, प्रिपेड मीटरच्या निर्णयाचा धिक्कार असो, बंद करा बंद करा.. स्मार्ट मीटर बंद करा' अशा घोषणा देत मोर्चेकरांनी रोहा शहर दणाणून सोडले. स्मार्ट मीटरची सक्ती ताबडतोब बंद करावी, आमचा यास पूर्णपणे विरोध आहे, असा स्पष्ट इशारा यावेळी आंदोलनकर्त्यांनी महावितरणला दिला.



सध्या रोहा शहर व ग्रामीण भागात विजेचे जुने मीटर बदलून नवीन स्मार्ट मीटर बसवण्याचा सपाटा सर्वत्र सुरू असून, त्याला विरोधदेखील होत आहे. परंतु, त्या विरोधाला न जुमानता महावितरणचे ठेकेदार बिनदिक्कत स्मार्ट मीटर बसवत आहेत. त्यामुळे विजेचे बिल तिप्पट येत असल्याने नागरिकांची मोठी ओरड होत आहे. त्याची दखल घेत सर्वहरा जनआंदोलन व महाविकास पान २ वर

## आशा सेविकाच्या प्रश्नांबाबत चित्रलेखा आक्रमक

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागात तळागाळापर्यंत आशा सेविका काम करतात. कोरोना काळात जीवाची पर्वा न करता, त्यांनी घरोघरी काम केले. शेवटच्या घटकांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्याबरोबरच आपत्कालीन परिस्थितीत रात्रीचा दिवस काम करणाऱ्या आशा सेविका आर्थिक संकटात सापडल्या आहेत. जून महिन्यापासून त्यांना शासनाकडून मानधनच मिळाले नाही. त्यांची पिळवणूक केली जात आहे. ही मोठी गंभीर बाब आहे. शेतकरी कामगार पक्ष हे कदापि सहन करणार नाही. दिवाळीपूर्वी आशा सेविकांना मानधन मिळाले पाहिजे, अन्यथा तीव्र आंदोलन पुकारले जाईल, असा इशारा शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला. आशा सेविकांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत चित्रलेखा पाटील यांनी आक्रमक होत आपले मत मांडले. आशा सेविकांच्या मानधनाबरोबरच प्रलंबित मागण्यांबाबत शेतकरी भवनमध्ये बुधवारी (दि. १५) पान २ वर



(छायाचित्र : समीर मालोदे)

> **आशा सेविकांच्या मदतीने शासनाच्या सर्व योजनांची अंमलबजावणी केली जाते. तळागाळापर्यंत योजना पोहोचवून सर्वसामान्यांना त्या योजनांचा लाभ मिळवून देण्याचे काम करतात. परंतु, त्यांना मानधन वेळेवर देत नाही, ही मोठी चिंतेची बाब आहे. दरवेळेला हा प्रश्न भेडसावत आहे. शासनाने तात्काळ मानधन देण्याची प्रक्रिया राबवावी.**
>
> **– प्रांजली कदम, आशा सेविका**

> **काही तांत्रिक कारणासह निधीअभावी मानधन रखडले होते. परंतु, दिवाळीपूर्वी आशा सेविकांना मानधन मिळण्याची शक्यता असून, त्याची हालचाल सुरू आहे. – डॉ. मनीषा विखे, जिल्हा आरोग्य अधिकारी**

### दिवाळी बोनसचे फक्त आश्वासनच

- दिवाळी हा सर्वांच्याच आवडीचा सण म्हणून ओळखला जातो. दिवाळीपूर्वी गेल्या तीन वर्षांपासून दिवाळीपूर्वी बोनसचे आश्वासन सरकारकडून दिले जाते. शासनाने दिवाळी बोनस मंजूर केला आहे. मात्र, त्याचे परिपत्रक अद्याप काढण्यात आले नाही. दिवाळी बोनसची पूर्तता केली जात नाही. २०२३ पासून दिवाळी बोनसचे आश्वासन देण्यात आले आहे. परंतु, त्याची अंमलबजावणी अजूनपर्यंत झाली नसल्याची खंत आशा सेविका अनुराधा गायकवाड यांनी व्यक्त केली.

## एसटी बँकेच्या सभेत राडा

### सदावर्ते गट-शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्त्यांमध्ये वाद

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

एसटी बँकेच्या बैठकीमध्ये सदावर्ते गट आणि शिवसेना शिंदे गटाचे अडसूळ यांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा राडा झाला आहे. या बैठकीच्या दरम्यान दोन्ही गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले. यामध्ये चार ते पाच संचालक जखमी झाल्याची माहिती आहे. या दोन्ही गटाचा वाद आता नागपाडा पोलीस ठाण्यात पोहोचला असून, एकमेकांविरोधात तक्रारी देण्यात आल्या आहेत.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर एसटी बँकेची मिटिंग बोलवण्यात आली होती. त्यामध्ये दिवाळी बोनस वाटपाची चर्चा करण्यात आली. याच मुद्द्यावरून सदावर्ते गट आणि अडसूळ गट यांच्यामध्ये मतभेद झाले आणि नंतर त्याचे रुपांतर हाणामारीमध्ये झालं. एसटी बँकेच्या संचालकांच्या बैठकीमध्ये बाहेरुन आलेली माणसे बसवण्यात आल्याचा आरोप अडसूळ गटाकडून करण्यात येत आहे.



## सहा कोटींचे चिनी फटाके जप्त

### जेएनपीए बंदरात मुंबई डीआरआय विभागाची कारवाई

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महसूल गुप्तचर संचालनालय, मुंबईने सोमवारी न्हावा-शेवा बंदरातून ६.३२ कोटी रुपये किमतीचे २० मेट्रिक टन चिनी फटाके जप्त केले आहेत.

विश्वसनीय खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीनंतर मुंबई महसूल गुप्तचर संचालनालयाने ही कारवाई केली. तस्करांनी पकडले जाऊ नये म्हणून लेगिंग्जच्या नावाची चुकीची घोषणा करून फटाक्यांची तस्करी केली होती. न्हावा-शेवा बंदरात आलेल्या कंटेनरची तपासणी करताना त्यांना लेगिंग्जऐवजी कंटेनरमध्ये ९५ टक्के जागेत लपवून ठेवलेले चिनी मूळचे फटाके आढळून आले. ६०,००० फटाक्यांच्या बॉक्समधून २० मेट्रिक टन चिनी फटाके आढळून आले. या फटाक्यांची किंमत ६.३२ कोटी रुपये आहे. आयात करण्यात आलेले फटाके परदेशी व्यापार धोरणांतर्गत प्रतिबंधित आहेत. चिनी फटाके हानिकारक आहेत. कारण त्यात लाल शिसे, तांबे, ऑक्साईड आणि लिथियमसारखी प्रतिबंधित रसायने असतात. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षितता, बंदरातील पायाभूत सुविधांना धोका निर्माण होतो. यामुळे या फटाक्यांवर प्रतिबंध घालण्यात आला आहे. मात्र, त्यानंतरही फटाक्यांची तस्करी केली जात असल्याचे समोर आले आहे.



## शेतकऱ्यांना विदेश दौऱ्यासाठी आता दोन लाख रुपये अनुदान

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

जगातील सर्वोत्तम शेती तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी आपल्या शेतात वापरावे यासाठी परदेशी अभ्यास दौऱ्याचे कृषी विभागामार्फत आयोजन केले जाते. २०१२ नंतरच्या काळात प्रवास, निवास आणि परकीय चलनातील दरवाढ लक्षात घेता, विद्यमान १ लाख रुपयांच्या मर्यादेत शेतकऱ्यांना पुरेशी मदत मिळत नव्हती. त्यामुळे अनुदान मर्यादा दुप्पट करून दोन लाख रुपये करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. हा निर्णय म्हणजे शेतीला अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न आहे, अशी प्रतिक्रिया कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.



राज्यातील शेतकऱ्यांना जागतिक स्तरावरील प्रगत कृषी तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ विस्तार आणि उत्पादनवाढीच्या नवीन पद्धतींचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे यासाठी राबविण्यात येणाऱ्या 'राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे' या योजनेत मोठा बदल करण्यात आला आहे. राज्य शासनाने या योजनेंतर्गत प्रति शेतकरी दिल्या जाणाऱ्या अनुदानाची कमाल मर्यादा एक लाखांवरून वाढवून दोन लाख इतकी करण्यास मान्यता दिली आहे. राज्यातील शेतकरी या योजनेंतर्गत आतापर्यंत अमेरिका, इस्रायल, जपान, ऑस्ट्रेलिया, नेदरलँड्स, फ्रान्स, थायलंड इत्यादी देशांत अभ्यास दौरे केले आहेत.

## मिनीट्रेनची पावसाळी सुट्टी वाढली

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

ब्रिटिशकाळात सुरू झालेली नेरळ-माथेरान-नेरळ ही नॅरोगेज मार्गावर चालवली जाणारी मिनीट्रेन पावसाळी सुट्टी वाढली आहे. ब्रिटिश काळापासून १५ जून रोजी पावसाळी सुट्टीवर गेलेली मिनीट्रेन दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी सुरू होत होती. मात्र, नॅरोगेज मार्गावर अभियांत्रिकी कामे सुरू असल्याने यावर्षीदेखील पावसाळी सुट्टीनंतर नेरळ-माथेरान-नेरळ अशी प्रवासी वाहतूक सुरू झालेली नाही. दरम्यान, मिनीट्रेनची वाहतूक सुरू झालेली नसल्याने पर्यटकांचा हिरमोड झाला असून, दिवाळी सणानंतर नेरळ-माथेरान-नेरळ मार्गावर मिनीट्रेन सुरू होणार आहे.

ब्रिटिशकाळात १९०९ मध्ये सर आदमजी पीरभोय यांनी नेरळ-माथेरान या २१ किलोमीटर लांबीचा मिनीट्रेन मार्गाचा शोध लावला. पुढे मध्य रेल्वेचे ताब्यात हा रेल्वे मार्ग देण्यात आला आणि पान २ वर



### मिनीट्रेन पर्यटन हंगाम

**१६ ऑक्टोबर ते १५ जून असा असतो. मात्र, यावर्षी २५ मेपासून मिनीट्रेन नेरळ येथून सोडली गेली नाही. तर, यावर्षी मिनीट्रेन १६ ऑक्टोबरपासून सुरू झालेली नाही.**

- **पुन्हा एकदा मोडला आपला शिरस्ता**
- **मिनीट्रेनचा नॅरोगेज मार्ग सुस्थितीत नाही**
- **पर्यटकांचा हिरमोड**
- **दिवाळीनंतरच थेट प्रवास सुरू होणार**

## राष्ट्रीय बाल विज्ञान प्रदर्शनात होणार सहभागी | शिक्षकांसह विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव

# 'एलएईएस'ची 'लाडकी' देशपातळीवर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांकावर राहिलेला कर्जत तालुक्यातील नेरळ येथील एलएईएस शाळेच्या विद्यार्थ्यांची प्रतिकृती राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात पोहोचली आहे. 'लाडकी' या नावाचे हे मॉडेल देशपातळीवर पोहोचले असून, राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात भोपाळ येथे या प्रतिकृती पोहोचली आहे.

भोपाळ येथे होणाऱ्या ५२ व्या राष्ट्रीय बाल विज्ञान प्रदर्शन भरणार आहे. या विज्ञान प्रदर्शनात महाराष्ट्र राज्याकडून रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील नेरळ येथील एलएईएस शाळेचा उपक्रम पोहोचला आहे. एलएईएस शाळेच्या विद्यार्थ्यांचा 'लाडकी' हा विज्ञान प्रकल्प आता राष्ट्रीयस्तरावर पोहोचला आहे. कर्जत तालुका विज्ञान प्रदर्शन २०२४-२५ अंतर्गत सादर झालेला हा प्रकल्प प्रथम तालुका, रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शनात प्रथम आणि राज्य स्तरावर यशस्वी ठरल्यानंतर एलएईएस शाळेची प्रतिकृती राष्ट्रीय बाल विज्ञान प्रदर्शनात मांडण्यात येणार आहे. नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग नवी दिल्ली यांच्यावतीने आयोजित ५२ व्या राष्ट्रीय बाल विज्ञान प्रदर्शन २०२५ मध्ये सहभागी होण्यासाठी निवडला गेला आहे. राष्ट्रीय प्रदर्शन दि. १८ ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान भोपाळ येथील रिजनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन येथे भरविले जाणार आहे. महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व हे मॉडेल करणार असून, या मॉडेलची निर्मिती शाळेची विद्यार्थिनी कृषा गणेश सावंत सादरकर्ती असून, तिला विशाल राठोड यांचे मार्गदर्शन लाभत आहे. शाळेच्या समन्वयक गायत्री सावंत भोसले, तसेच शिक्षक संकेत, सूरज यांचेदेखील योगदान मिळत आहे. एलएईएस इंग्लिश हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या मुख्याध्यापक अजिता नायर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# ई-रिक्षामुळेच वाहतुकीत क्रांती

## ● माथेरानचे माजी नगराध्यक्ष प्रदीप दिवाडकर यांचे मत

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानचे माजी नगराध्यक्ष प्रदीप दिवाडकर यांनी सोमवारी प्रथमच ई-रिक्षामधून प्रवास केला. ई-रिक्षा ही एक अत्यंत स्वस्तातील व सोयीची असल्याने येथील रहिवासी व दरवर्षी माथेरानला भेट देणाऱ्या दहा लाख पर्यटकांसाठी हक्काची वाहतूक व्यवस्था सुरु झाली असल्याच्या भावना प्रदीप दिवाडकर यांनी व्यक्त केल्या.



ब्रिटिश काळापासून माथेरान येथे वाहनांना बंदी असल्यामुळे घोडा व हातरिक्षा यांचा वापर अंतर्गत वाहतुकीसाठी केला जात होता. हातरिक्षा ही एक अमानवीय प्रथा असल्यामुळे परवानधारक या हातरिक्षा चालकांचे पर्यावरणपूरक अशा ई-रिक्षाद्वारे पुनर्वसन करण्यात यावे यासाठी सर्वोच्च न्यायालयात सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे यांनी दाखल केली होती. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी हातरिक्षा या मानवी हक्काचे उल्लंघन करीत असून, ही एक अमानवीय प्रथा असल्यामुळे सहा महिन्यांत बंद करून राज्य सरकारने स्वतः विकत घेऊन या चालकांचे पुनर्वसन करण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला आहे. या निर्णयाची अंमलबाजवणी सनियंत्रण समितीच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. रिक्षा संघटनेचे सदस्य सुनील शिंदे, रुपेश गायकवाड, प्रकाश सुतार व संतोष लखन यांनी दिवाडकर यांची भेट घेऊन ई-रिक्षा प्रकल्पची सविस्तर माहिती दिली. सामाजिक कार्यकर्ते तुषार सकपाळदेखील यावेळी आवर्जून उपस्थित होते.

दरवर्षी मे महिन्यात होणाऱ्या अश्वशर्यती या माथेरानचे प्रमुख आकर्षण आहे. प्रदीप दिवाडकर गेली पन्नास वर्षांपासून यांचे आयोजन करीत असतात. पावसामुळे मे महिन्यात अश्वशर्यती होऊ न शकल्याने डिसेंबर महिन्यात घेण्याबाबत नियोजन सुरु असल्याचे दिवाडकर यांनी सांगितले.

> **बाबांना चालणे शक्य होत नसल्याने त्यांना माथेरानला घेऊन येताना रुग्णावाहिका मिळेल की नाही याचे कायम टेन्शन राहायचे. मात्र, ई-रिक्षामुळे खूपच सोयीचे झाले आहे. त्यामुळे लवकरात लवकर ई-रिक्षांची संख्या वाढली पाहिजे.**
>
> **- प्रशाम दिवाडकर, अध्यक्ष, यूथ सोशल क्लब, माथेरान**

## ‘लाभार्थ्यांनी धान्य घ्यावे’

**अलिबाग :** राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत राज्यातील अंत्योदय व प्राधान्य गट योजनेतील पात्र लाभार्थ्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत रास्तभाव धान्य दुकानातून धान्य वाटप करण्यात येते. दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पात्र लाभार्थ्यांनी दि.२० ऑक्टोबरपर्यंत रास्त भाव धान्य दुकानातून धान्याची उचल करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे यांनी केले आहे. तसेच या कालावधीत ई-केवायसी न केलेल्या प्रत्येक लाभार्थ्यांचे दुकानदाराने मशीनवर अंगठा घेऊन ई-केवायसीचे काम पूर्ण करुन घ्यावे, याबाबत कोणतीही कुचराई करु नये. ही लाभार्थ्यांना शेवटची संधी असून, ई-केवायसी न केलेल्या लाभार्थ्यांचे धान्य बंद करण्यात येईल. ज्या पात्र लाभार्थ्यांनी ई-केवायसी केली नसेल त्यांनी दुकानदाराकडे धान्य घेताना ई-केवायसी करुन घ्यावी.

## बार्न्स महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस



**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

भारताचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ व माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर रोजी बार्न्स महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात आला.

कॉलेजचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवदास कांबळे यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

कॉलेजचे प्राचार्य कल्पेश भोईर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या मनात वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने वाचन प्रेरणा दिवस महाविद्यालयात संपन्न झाला.

पाठ्यपुस्तकांखेरीज अवांतर वाचन प्रत्येक विद्यार्थ्याने करावे. अवांतर वाचनामुळे वेगवेगळे संदर्भ, माहिती विद्यार्थ्यांना मिळते. आकलन शक्ती वाढते. चांगले बोलता व लिहिता येते. म्हणून सर्वांनी वाचलेच पाहिजे. ‘वाचाल तर वाचाल’चे महत्त्व ग्रंथपाल ज्योती म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

पान १ वरून

## अन्यथा निवडणूका घेऊ देणार नाही

सीपी कम्युनिस्ट, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षासह व महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

मतदारयादी सदोष व बनावट दुबार नावे असल्याचे पुरावे यावेळी निवडणूक आयोगाला दाखविण्यात आले. अनेकांची नावे डबल टाकण्यात आली आहेत. सदोष मतदार याद्यांमुळे गैरप्रकार चालत असल्याची माहिती देण्यात आली. मतदारयादी निर्दोष होऊन दुरुस्त होत नाही, तोपर्यंत निवडणुका घेऊ नका, अशी मागणी महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आली. सदोष मतदार यादीमुळे चुकीचे उमेदवार निवडून येतात. त्याची उदाहरणे यावेळी देण्यात आली. मतदान प्रक्रिया विश्वासाने होण्यासाठी व्हीव्ही पॅटचा वापर होणे गरजेचे आहे. तसेच बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात याव्यात, अशी मागणी महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने केली. सदोष मतदार याद्या दुरुस्त न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

**पुराव्यासह बोगस मतदारांचा लेखाजोखा- जयंत पाटील**

आम्ही कालच राज्याचे निवडणूक आयुक्त यांना भेटून निवेदन दिलं, मतदार यादीतील अनंत चुका दाखवल्या. सीओंनी आम्हाला आश्वासित केलं की, केंद्रीय निवडणूक आयोगाला पत्र पाठवून दुरुस्त्या केल्या जातील. दोघांचे प्रश्न म्हणून आम्ही आजही भेट घेतली, काही महत्वाच्या पुरावे सहीत आम्ही माहिती दिली. पुराव्यांसोबत पत्रही दिली, मतदार यादीत मतदारांचे पत्ते चुकीचे आहेत, प्रत्यक्षात मतदार त्या पत्यावर राहात नाहीत, असे म्हणत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी काही उदाहरणं देखील संदर्भासहीत दिली. त्यामध्ये, मुरबाडमध्ये बुथ क्र ८ मध्ये ४०० मतदाराचं एक घरं आहे, तिथे डॅश आहे. वडनेरामध्ये कामटीमध्ये घर क्रमांकचं नाही. बऱ्याच ठिकाणी दुबार मतदार आहे. एपीक नंबर एकच असतो. मात्र मतदार यादीत अनेक असल्याचे आम्ही आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. नालासोपारामध्ये सुषमा गुप्ता महिलेचे नाव ६ वेळा नोंदवले आहे, १२ ऑगस्टला आमच्या कार्यकर्त्याने हे दुपारी दाखवलं. त्यानंतर, ६ वाजता त्या महिलेचे नाव काढलं, आपण एका चॅनेलमधून बातमी दाखवतो दुपारी ३ वाजता ती नावं असतात, पण ६ वाजता नावं काढतात. निवडणूक आयोगाला आम्ही विचारलं ही नावं कोणाच्या सांगण्यावर काढली, तक्रार कोणी केली. महाराष्ट्र निवडणूक आयोगाचं सर्वर दुसरं कोणी तरी चालवतो. राज्य किंवा केंद्राच्या हातात ही यंत्रणा नसून बाहेरूनच कोणी तरी हे चालवतं आहे. पुण्यात ८६९ मतदारांची नोंद आहे, दर तासाला मतदार यादी जाहीर होत कोणी कुठे किती मतदान केलं, विधानसभेला हे सिस्टम तोडलं, थेट दुसऱ्या तिसऱ्या दिवशी मतदान टक्केवारी जाहीर केली. आम्ही विधानसभेला याद्या वाचल्या, हेच स्थानिक स्वराज्य संस्था निवणुकीत चालू राहिलं तर कठीण आहे. मुदत वाढवून चालणार नाही, मतदार याद्या तपासा. बोगस मतदार काढून टाका. एक खासदार सांगतात २० हजार मतदार बाहेरून आणल्याने माझा विजय झाला ही नोंद घ्या, अशी मुद्देसूद मांडणी जयंत पाटील यांनी केलीय.

## आशा सेविकाच्या प्रश्नांबाबत चित्रलेखा आक्रमक

आयोजित पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. यावेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या. यावेळी आशा सेविका उपस्थित होत्या.

अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे शासन शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्यास अपयशी ठरत असल्याने शासनाने ग्रामीण भागात स्थानिक महिलांची मदत घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी आशा सेविका पद नियुक्त करण्यात आले. रायगड जिल्ह्यामध्ये दीड हजारहून अधिक आशा सेविका आहे. आशा सेविकांच्या मदतीने शासनाच्या योजना घराघरात पोहोचविणे, आपत्कालीन परिस्थितीत मदतीचा हात देणे, माता, बाल मृत्यूचे प्रमाण टाळणे, बालक व मातेचे आरोग्य राखण्याबरोबरच जन्म, मृत्यूची नोंद ठेवणे, बालकांसह मातांचे लसीकरण करणे. गावांतील प्रसूत महिलेला दवाखान्यात नेण्यापासून त्यांचे आरोग्य राखण्यासाठी सहकार्य करण्याचे काम आशा सेविका करतात. कृष्ठरोग व इतर साथीच्या आजारांवर उपाय करण्यासाठी अंमलबजावणी करणे. जनजागृती करणे अशा अनेक प्रकारची कामे आशा सेविका करतात. आयुष्यमान, आभाकार्ड काढण्यासाठी गावागावात प्रचार व प्रसार करण्याचे कामही आशा सेविका करीत असतात. ग्रामीण भागात आशा सेविका कष्टाचे काम करत असताना त्यांना प्रचंड त्रास होतो. त्यांच्या शासनाकडून अन्याय केला जात आहे. ही मोठी गंभीर बाब आहे. कुष्ठरोग व इतर साथीच्या आजारांवर उपाय करण्यासाठी अंमलबजावणी करणे. जनजागृती करणे अशा अनेक प्रकारची कामे आशा सेविका करतात. आयुष्यमान, आभाकार्ड काढण्यासाठी गावागावात प्रचार व प्रसार करण्याचे कामही आशा सेविका करीत असतात.

राज्य शासनासह केंद्र शासनाच्या योजनांची कामे आशा सेविकांमार्फत केली जातात. केंद्राचे काम केल्यास राज्य शासनाकडून त्यांना दर महिन्याला मानधन दिले जाते. परंतु, गेल्या जून महिन्यापासून आशा सेविकांना मानधनच देण्यास सरकार उदासीन ठरले आहे. केंद्राकडून जून ते सप्टेंबरपर्यंतचे मानधन थकले आहे. राज्याकडून ऑगस्ट ते सप्टेंबर या दोन महिन्यांचे मानधन देण्यात आले नाही.

दर महिन्याला मानधन वेळेवर मिळत नसल्याने आशा सेविकांसमोर आर्थिक समस्या निर्माण झाली आहे. शासनाच्या सर्व योजनांची कामे त्यांच्याकडून करून घेतल्या जातात. परंतू त्यांना शासनाचा दर्जा दिला जात नाही. ऑनलाईन कामे आशा सेविकांकडून करून घेतले जातात. परंतु, लागणारी यंत्रणा, पुरेसा रिचार्ज भत्ता दिला जात नाही. आशा सेविकांना राबविले जाते. मात्र, मानधनासह अनेक सुविधांपासून वंचि दिल्या जात नाही. अनेकवेळा आशा सेविकांनी याबाबत मागणी केली आहे. परंतु त्याची दखल घेतली जात नाही.गणेशोत्साबरोबरच नवरात्रौत्सव सण मानधनाविनाच गेला. दिवाळी सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे.तरीदेखील मानधन देण्यास शासनाकडून कोणत्याही हालचाली सुरु झाल्या नाहीत. त्यामुळे आशा सेविकांनी रविवारी शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांची शेकाप भवन येथे भेट घेतली. समस्यांचा पाडाच त्यांनी वाचून दाखविला.आशा सेविकांच्या या प्रश्नांबाबत चित्रलेखा पाटील आक्रमक झाल्या. सरकारच्या भुमिकेबाबत संताप व्यक्त करीत चार दिवसांत आशा सेविकांच्या मागण्यापूर्ण करा अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा त्यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिला.

मानधनासह अनेक मागण्या आशा सेविकांच्या प्रलंबित आहेत. या मागण्यांसाठी अनेक वेळा शासन दरबारी निवेदन दिले आहे. वरिष्ठ पातळीवर चर्चादेखील केली आहे. परंतु त्याची दखल घेतली जात नाही. दर महिन्याला वेळेवर मानधन मिळावी, ही अपेक्षा असून, इतर मागण्यांचीदेखील दखल घ्यावी.

वैशाली म्हात्रे, आशा सेविका

## रोह्यात स्मार्ट मीटरविरोधात जनआक्रोश

आघाडीतील सर्व घटक पक्षांनी पुढाकार घेत मोर्चाची हाक दिली होती. त्याला नागरिकांनी जोरदार प्रतिसाद दिला आणि बुधवारी मोर्चा थेट रोहा येथील महावितरण कार्यालयावर धडकला.

यावेळी सर्वहार जनआंदोलनाच्या नेत्या उल्का महाजन, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्रजी पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण, तालुका अध्यक्ष तुषार खरीवले, मनसे जिल्हा सचिव अमोल पेणकर, मनसे माजी तालुका अध्यक्ष अक्षय रटाटे, मनविसे रोहा तालुका अध्यक्ष प्रफुल्ल पाटील, रोहा तालुका काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष सुनील देशमुख, सर्वहार जनआंदोलन जिल्हाध्यक्ष सोपान सुतार, शिवसेना (ऊबाठा) तालुका प्रमुख नितीन वारंगे, माजी तालुका प्रमुख विष्णू लोखंडे, सल्लागार रमेश विचारे, सुधीर सोनावणे, उपतालुका प्रमुख सचिन फुलारे, उपाध्यक्ष पांडुरंग वाघमारे, कार्याध्यक्ष चंद्रकांत गायकवाड व रोहेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, हा मोर्चा रोहा महावितरण कार्यालयाच्या समोर येताच जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. तसेच आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाने महावितरणचे कार्यकरी अभियंता प्रमोद दालू यांची भेट घेऊन आपल्या मागण्याचे निवेदन देत स्मार्ट मीटरला तीव्र विरोध दर्शवला. यापुढे एकही प्रीपेड मीटर बसवता कामा नये, तसेच जे स्मार्ट मीटर लावण्यात आले आहेत, ते एक महिन्याच्या आत तात्काळ काढण्यात यावेत, नवीन स्मार्ट मीटरमुळे आलेली वाढीव बिले तात्काळ कमी करण्यात यावी, महावितरण कंपनीचे खासगीकरण करणे तात्काळ थांबवा, या प्रमुख मागण्यांसह रायगड जिल्ह्यात सुरु केलेली स्मार्ट प्रीपेड मीटर योजना तात्काळ थांबवण्यात यावी, असा स्पष्ट इशाराच यावेळी देण्यात आला. यावेळी नागरिकदेखील मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महावितरण कंपनीने राज्यातील सर्व वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावणार असे जाहीर करून हे मीटर कंपनीच्या खर्चाने मोफत लावणार अशी फसवी व चुकीची जाहिरात केली आहे. या संबंधातील टेंडर मंजूर करून सर्वत्र मीटर लावण्याची मोहीम सुरू झालेली आहे. वास्तविक हे मीटर मोफत लावले जाणार नाहीत. केंद्र सरकारचे अनुदान वगळता या मीटरचा उर्वरित सर्व खर्च वीजदर निश्चिती याचिकेद्वारे आयोगाकडे मागणी केला जाईल आणि आयोगाच्या आदेशानुसार वीज दरवाढीच्या रुपाने १ एप्रिल २०२५ पासून ग्राहकांच्या खिशातूनच वसूल केला जाईल, हे निश्चित व स्पष्ट आहे. त्यामुळे केवळ महावितरण कंपनी वा येणाऱ्या खासगी वितरण कंपन्या वा सरकार यांच्या हितासाठी आणि खासगीकरणाच्या वाटचालीतील पुढचा टप्पा म्हणनूच ही योजना आणलेली आहे, असे स्पष्ट दिसून येत.

## मिनीट्रेनची पावसाळी सुट्टी वाढली

त्यानंतर मध्य रेल्वेचे माध्यमातून नेरळ-माथेरान-नेरळ नॅरोगेज मार्गावर मिनीट्रेन सुरू झाली. ही मिनीट्रेन ब्रिटिश काळापासून पावसाळ्यात दरडी आणि माती कोसळण्याचा धोका लक्षात घेऊन बंद ठेवली जाते. ब्रिटिश काळापासून हा शिरस्ता कायम असून, नेरळ माथेरान नेरळ मिनीट्रेन १५ जूनपासून १५ ऑक्टोबरपर्यंत पावसाळी सुट्टी आणि नॅरोगेज मार्गावर दुरुस्तीची कामे करण्यासाठी बंद ठेवली जाते. मात्र, चार महिन्यांनी सुरू होणारी मिनीट्रेन १६ ऑक्टोबर रोजी पुन्हा नॅरोगेज मार्गावर येत असल्याने पर्यटक आणि प्रवासी यांच्यासोबत माथेरानमधील हॉटेल व्यावसायिक यांच्यात आनंदाचे वातावरण असते.

माथेरान राणी म्हणून ओळखली जाणारी मिनीट्रेन आणि माथेरानमधील पर्यटन व्यवसाय हे समीकरण झाल्याने माथेरानमधील पर्यटन व्यवसायाला मिनीट्रेन सुरू झाल्यानंतर सुगीचे दिवस येतात. मात्र, मागील काही वर्षात मिनीट्रेनचा पावसाळी हंगाम लांबत चालला आहे. तर, १५ जून ही बंद होण्याची तारीखदेखील दरवर्षी बदलली जात आहे. यावर्षी तर २५ मेपासूनच मिनीट्रेनचा पर्यटन हंगाम बंद करावा लागला होता. गतवर्षी २२ ऑक्टोबर रोजी म्हणजे नेहमीच्या शिरस्त्यानुसार आठ दिवस उशिरा मिनीट्रेन नेरळ-माथेरान-नेरळ मार्गावर चालण्यास सुरुवात झाली होती. यावर्षी पाऊस लांबला असल्याने मिनीट्रेनचा प्रवास आज नेहमीच्या तारखेला सुरू झालेला नाही. त्यात काही दिवसांनी दिवाळी सण सुरू होत असून, यावर्षीदेखील दिवाळीमध्ये मिनीट्रेनची सेवा सुरू झालेली नसेल, त्यामुळे पर्यटन व्यवसायावरदेखील परिणाम होण्याची शक्यता आहे. उन्हाळी पर्यटन हंगाम यावर्षी मे महिन्यात सुरू झालेल्या अवकाळी पावसाने वाहून नेला होता. परंतु, पावसाळ्यात तीन महिने प्रचंड प्रमाणात पर्यटकांची गर्दी माथेरानमध्ये पहायला मिळाली.

## वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

निसर्गप्रेमी संस्था कामोठेचे अध्यक्ष सुनील करपे यांच्या वाढदिवसानिमित्ताने कामोठे सेक्टर २० उद्यान येथे वृक्षारोपण कार्यक्रम राबवण्यात आला. सुनील करपे यांच्या वाढदिवसानिमित्ताने वृक्षारोपण करण्याचे आवाहन करण्यात आले होते. यावेळी कामोठे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे, त्यांचे सहकारी कामोठे महोत्सवाचे प्रमुख ॲड. जय पावणेकर, शुभांगी खरात, सुरेश खरात, सागर पाटील, रवी गोवारी, पंकज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## पूरग्रस्तांना कामोठेतून मदतीचा हात

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे रहिवासी सामाजिक सेवा संस्था, ओम शिव शंकर सेवा मंडळ कामोठे व जय हरी महिला मंडळ कामोठे, संस्थापक अध्यक्ष पोपटशेठ आवारी यांच्या मार्गदर्शनाखाली पूरग्रस्त भाग बीड व शेवगाव येथे शेतकऱ्यांना दोन गाड्या जीवनावश्यक वस्तू पाठवण्यात आल्या.



या वस्तूंची किंमत जवळजवळ सहा लाख रु. होती. हे करत असताना, पोपटशेठ आवारे, सुवर्णा वाळुंज, वर्षा चौधरी,प्रमिला आहेर, गीता उंडे, रंजना ढवन, प्रीती खिलारी संजना वाघमारे, सुप्रिया माने, सुरेखा गुंजाळ संगीता पवार, पुष्पा पोटे, उषा आवारी, साबळे ताई, सत्रे ताई सुजाता चेडे, मनीषा वनवे, शारदा तोंडे, विनंती आंधळे, रंजना शिंदे, लता मोरे, ज्ञानेश्वर सत्रे, शोभा डेरे, ज्योती शिकारे, मंगल आवारी, शुभांगी कड, सुनिता वाबळे, रोहिणी डेरे, जाधव ताई, वनिता वाबळे, पल्लवी आवारी या सर्वांनी या सर्व वस्तु कामोठेमध्ये फिरून जमा केल्या.

मंडळातील सर्व सहकारी महिलानी या सर्व वस्तू पॅकिंग केल्या. मंडळाचे कार्यकर्ते दादाभाऊ वाळुंज, संदीप पोटे, योगेश चौगुले, अनिल पोटे, रवी बोहोत यांनी मदत केली. पोपटशेठ आवारे, सुरेश ढवन, आत्माराम आरोटे, बाबाजी ढोमे या सर्वांनी बीड आणि शेवगाव येथे जाऊन वस्तू प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत पोहोच केल्या.

# मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत

**। रायगड-अलिबाग । प्रतिनिधी ।**

मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून ऑनलाईन महाडीबीटी पोर्टलवर विजाभज, इमाव व विमान या प्रवर्गातील इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवत्ती/गुणवत्ता शिष्यवत्ती योजनांचे लाभाचे अर्ज नोंदणी सुरु झाली असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी मॅट्रीकपूर्व शिष्यवत्ती/गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण रायगड सुनील जाधव यांनी केले आहे.

इतर मागास बहुजन कल्याण या विभाग कडून मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती/गुणवत्ता शिष्यवृत्ती राबविण्यात येणाऱ्या योजना पुढीलप्रमाणे आहेत. इतर मागासवर्गीय प्रवर्गातील ५ वी ते ७वीपर्यंतच्या मुलीसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, इतर मागासवर्गीय प्रवगांतील ८ वी ते १० वी इयत्तेतील मुलीसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, आठवी ते दहावीत शिकणाऱ्या व्हीजेएंटी आणि एसबीसी मुलीसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, माध्यमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवंत शिष्यवृत्ती, पाचवी ते सातवी इयत्तेत शिकणाऱ्या व्हीजेएनटी आणि एसबीसी मुलीसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, ट्यूशन फी आणि परीक्षा फी भरणे (किंवा), सैनिकी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देखभाल भत्ता.

अर्ज प्रक्रिया :- महाडीबीटी पोर्टलवरवर ऑनलाईन अर्ज करणे, प्रथमता महाडीबीटी पोर्टलवरवर शाळांच्या मुख्याध्यापकांनी (महाडीबीटी पोर्टलवर प्री-मॅट्रिक योजनांसाठी अर्जाच्या नोंदणीसाठी, शाळेच्या मुख्याध्यापकांनी यूजर आयडीमध्ये_२७ आणि पासवर्डमध्ये १२३ टाइप करून लॉग इन करा), मुख्याध्यापकांनी पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मुख्याध्यापकांच्या लॉगीन मधून भरणे, अर्ज भरल्यानंतर गटशिक्षणाधिकारी यांना फोरवर्ड करणे, गटशिक्षणाधिकारी कडून अर्ज इतर मागास बहुजन कल्याण रायगड अलिबाग या कार्यलयाकडे फॉरवर्ड करणे, शिष्यवृत्ती अर्ज मंजूर झाल्यानंतर शिष्यवृत्तीची रक्कम डीबीटीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होणार.

यासाठी आधार क्रमांक बँक खाते क्रमांकला लिंक असणे आवश्यक असणार आहे.

## निवडणुकीत प्रचारक वाढणार

**मुंबई :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रमुख प्रचारकांच्या संख्येची मर्यादा २० वरून ४० तसेच उमेदवारांच्या निवडणूक खर्चातही वाढ करण्याबाबत आयोग निर्णय घेईल, अशी ग्वाही राज्य निवडणूक आयोग आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत मंगळवारी आयोगाच्या कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरल्या जाणाऱ्या मतदार यादीत नव्याने नावे समाविष्ट करणार असल्याचे वाघमारे म्हणाले.

## पवई तलावात वॉटर स्पोर्ट्स मैदान करणार

### क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांची माहिती

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

परदेशात युवकांमध्ये वॉटर स्पोर्ट्सचे आकर्षण प्रचंड वाढत आहे. राज्यातील युवकांनाही वॉटर स्पोर्ट्स खेळण्याची संधी उपलब्ध व्हावी म्हणून मुंबईतील पवई तलावात वॉटर स्पोर्ट्स मैदान तयार करण्याचा मानस

आहेत. प्राथमिक स्तरावर मुंबई महापालिकेशी बोलणे देखील केल्याची माहिती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी येथे दिली. पवई तलावातील मगरींचा कोणताही धोका नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त भारत सरकारच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या सरदार१५० युनिट मार्च या उपक्रमाची माहिती देण्यासाठी क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे यांनी बुधवारी मंत्रालय वार्ताहर कक्षात पत्रकारांशी संवाद साधला.

सरदार१५० युनिट मार्च या उपक्रमांतर्गत राज्यात जिल्हा प्रशासन क्रीडा विभाग, माय भारत, एनएसएस, एनसीसी तसेच स्थानिक प्रशासन जिल्हास्तरीय पदयात्रा आयोजित करत आहे. येत्या ३१ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर दरम्यान प्रत्येक जिल्हात ८ ते १० किमी अंतराच्या तीन पदयात्रा होणार आहेत. युवकांच्या सहभागाने राज्याचे सर्वंकष युवा धोरण निर्माण केले जात आहे. त्यासाठी युवकांचे विचार, मते आणि सूचना

विचारात घेतल्या जात आहेत. त्यांना आपली मते नोंदवण्यासाठी विभागाने एक विशेष क्यूआर कोड निर्माण केला आहे. त्याला स्कॅन करून त्यांना आपला सहभाग नोंदवितात येईल. पुढील दीड महिन्यात युवा धोरणाचा अंतिम मसुदा पूर्ण होईल. नवीन वर्ष येण्यापूर्वीच राज्यातील तरुणांना नवीन युवा धोरण अस्तित्वात असेल असेही त्यांनी सांगितले.

# ‘फसवणूक टाळण्यासाठी सेंद्रीय प्रमाणपत्रांची तपासणी करणार’

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील सेंद्रीय प्रमाणित व नैसर्गिक शेती उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी राज्य शासन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहे. केंद्र शासन प्रमाणित संस्थाकडून राज्यातील शेतकऱ्यांना देण्यात येणारे सेंद्रीय प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे. या तपासणी मध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार आढळल्यास अशा संस्थाचा केंद्र शासनाला अहवाल पाठवणार असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

मंत्रालय येथे सेंद्रिय प्रमाणीकरण संस्था संदर्भात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी या बैठकीला माजी आमदार विजय भांबळे, माजी आमदार राहुल मोटे, आत्माचे संचालक सुनिल बोरकर, उपसचिव संतोष कराड,दूरदृश्यप्रणालीव्दारे ग्रीनसर्ट बायोसोल्युशन प्रा.लि. पुणेचे प्रतिनिधी सुनिल केसरे, ब्युरो व्हेरीटस प्रायव्हेट लिमिटेडचे सुचिता यादव, वनसर्ट इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड जयपूरचे आशिष दळवी यावेळी या बैठकीला उपस्थित होते. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यात सेंद्रीय प्रमाणित व नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी या उत्पादनाचे प्रमाणीकरण कोणत्या संस्थेव्दारे झाले आहे हे तपासणे तसेच प्रमाणिकरण प्रमाणपत्र व नियमावली यांची कृषि विभागाकडून माहिती देण्यात येईल. शेतकऱ्यांना संस्थाकडून वितरीत करण्यात आलेल्या एकाच प्रमाणपत्रावर इतर शेतकऱ्यांचा सेंद्रीय नसलेला माल विकून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी प्राथमिक स्तरावर वितरीत करण्यात आलेली आहे प्रमाणपत्र यांची तपासणी करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यात सेंद्रिय प्रमाणित व नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची फसवणूकटाळण्यासाठीशेतकऱ्यांच्या उत्पादनांचे प्रमाणीकरण करणाऱ्या संस्था या केंद्र शासनाच्या अखत्यारित असल्या तरी याबाबतीत राज्य शासन योग्य ती पाहणी करून यामध्ये दोषी आढळलेल्या संस्थांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत अहवाल केंद्र सरकारकडे सादर करेल.

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्व रा.स.पाटील गुरुजी (आप्पा)

राजकीय, सामाजिक, क्रिडा, सहकार, शैक्षणिक असा सर्वच क्षेत्रात कार्यरत्न असणारे सर्वसामान्यांच्या हाकेला धावणारे, उत्कृष्ट समालोचक, माणुसकीचा झरा म्हणून ओळख असणारे व्यक्तीप्रेमी उरणसह रायगड जिल्ह्यातील जनसामान्यांचे आधारवड रामदास सखाराम पाटील उर्फ रा.स. पाटील गुरुजी (आप्पा) यांचे रविवारी (दि.५) प्रदीर्घ आजारामुळे निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत असताना त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.

उरण तालुक्यातील बोकडविरा येथील रामदास पाटील तथा रा.स. पाटील गुरुजी (आप्पा) यांच्याबाबत सांगायचे झाल्यास एक अष्टपैलू व्यक्तीमत्व म्हणून बोलणे वावगे ठरणार नाही. शैक्षणिक, क्रीडा, सामाजिक, राजकीय, उत्कृष्ट वक्ता, समालोचक अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी स्वतःचा एक वेगळा ठसा उमटविला. १९४४ ला रा.स. पाटील गुरुजी यांचा जन्म झाला. अत्यंत गरिबीची परिस्थिती. आई-वडीलांकडून मिळलेल्या संस्कारातून आणि शिक्षणातून त्यांनी स्वतःला घडविले. जूनी दहावी (मॅट्रीक) झाल्यावर त्यांचा मुंबईतील आगरी समाज मंडळ येथे सत्कार करण्यात आला होता. त्यानंतर ते जिल्हा परिषद शिक्षण विभागात नोकरीला लगाले. सुरुवातीला मोखाडामधील दुर्गम भागात पंचायत समिती कार्यालयात ते कार्यरत होते. त्यानंतर त्यांची प्राथमिक शिक्षक म्हणून खोपटा शाळेवर नियुक्ती झाली. त्यांनी उरणमधील जसखार, मुळेखंड, पनवेलमधील मुर्बी, चिखले, शिवकर, न्हावाखाडी, उरण डोंगरी आदी शाळांमध्ये शिक्षक म्हणून सेवा केली. त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम केले. केंद्र प्रमुख म्हणून प्राथमिक शाळा डोंगरी उरण येथून सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्त झाल्यावर ते काही घरात बसून राहिले नाही. त्यांना सामाजिक कार्याची ओढ अगोदरपासूनच होती. आपल्या शिक्षणाचा फायदा समाजाच्या हितासाठी व्हावा, यासाठी त्यांनी स्वतःला समाजकार्यात वाहून घेतले. सिडको प्रकल्पग्रस्त शिक्षक संघटना, उरण प्राथमिक शिक्षक पतपेढीचे संचालक ते अध्यक्ष तसेच पेणच्या रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक पतपेढीचे दोन वेळा ते अध्यक्ष राहिले आहेत. सहकार क्षेत्र वाढविण्याबरोबरच शिक्षकांमध्ये सहकार क्षेत्राचा प्रचार व प्रसार करण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

शिक्षक संघटनांबरोबरच ज्येष्ठ नागरिक संघटना उरण निर्माण करून ज्येष्ठांना संघटनेच्या माध्यमातून एकत्र आणण्याचे त्यांनी काम केले. पर्यटन हा उद्देश समोर ठेवून शिक्षकांसह सेवानिवृत्त शिक्षकांच्या सहली काढण्यासाठी पुढाकार घेतला. त्यात त्यांनी 'आपली सहल' हा ग्रुप तयार केला. राज्यासह देशभरात सहलींचे आयोजन करून तेथील संस्कृतीचे दर्शन घडवून आणण्याचे काम










त्यांनी अगदी प्रामाणिकपणे केले. त्यासाठी लागणारे आर्थिक बळ व नियोजनामध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता.

**प्रमोद जाधव**

उरण येथील आपल्या बोकडविरा गावातील सर्व मंडळी एकत्र यावी, विचाराची देवाण-घेवाण व्हावी, म्हणून त्यांनी व त्यांचे मित्र एन.जी. पाटील, कॉ. घनश्याम पाटील, जी.डी. पाटील, तुळशीराम पाटील, श्यामसुंदर पाटील, कमळाकर पाटील आदी मंडळींनी किर्ती मंदिर नावाचे कार्यालय उभारले व गावातील होतकरू तरुणांना सामाजिक, क्रिडा, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य करण्यासाठी एकत्र आणले. सामाजिक क्षेत्रासह क्रीडा क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. गणेश क्लब गणेशपूर(बोकडविरा) कबड्डी संघ, श्री गणेश नाट्य मंडळ, गणेश लेझीम पथक, हॉलीबॉल आदींची उभारणी करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

रामदास पाटील तथा रा.स. पाटील गुरुजी यांना खेळाची फारच आवड होती. त्यात ते उत्तम वक्ते होते. 'गणेशक्लब गणेशपूर' संघाच्या माध्यमातून ३५ वर्षे कबड्डीचे उत्तम समालोचन त्यांनी केले. यातून त्यांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली. टाकादेवी मांडवा येथील नयन शिरगांवकर, गजानन पाटील, प्रतिज्ञा प्रभाकर समझीसकर, कमलपाडा लक्षण बैकर, झुंजार कणे, मारुती म्हात्रे, चंद्रकांत भोईर, नामदेव पाटील, नारायण भोईर, श्यामकांत पाटील आदि खेळाडूंसाठी ते गुरु समान होते. त्यांच्या उत्कृष्ट समालोचनने ते अनेक क्रीडा रसिकांना मंत्रमुग्ध करीत. कबड्डीचे समालोचन करताना ते 'कोणताही गुण न घेता परत, अतिशय खोलवर चढाई' इत्यादी त्यांचे शब्द आज ही कबड्डीच्या मैदानात गुंजतात. त्यामुळे क्रिडा क्षेत्रात समालोचक म्हणून त्यांची एक वेगळी ख्याती होती. ही ख्याती उरणपूरता मर्यादीत न राहता, संपूर्ण जिल्ह्यात पोहचली. त्यांना माजी नायब तहसीलदार मधुकर पाटील काळा यांनी कायमच साथ दिली. कबड्डी स्पर्धा सुरु होण्यापुर्वी लॉट काढण्याची एक पद्धतत आहे. हे लॉट काढण्यामध्ये त्यांची एक वेगळी ख्याती होती. स्वहस्ताक्षराने ते लॉट पाडायचे. त्यातून त्यांचे लिखाणाचे व दूरदृष्टीचे एक वेगळेपण दिसून येत होते. आपल्या वक्तृत्वाने हजारो श्रोते निर्माण केले आहेत. कबड्डीचे सर्वेसर्वा कै. नथुराम पाटील, जे.जे. पाटील आदी मंडळींचे त्यांच्यावर अपार प्रेम होते.

सहकार, समालोचक, उत्तम वक्ते याच बरोबरच ते उत्कृष्ट बुद्धीबळपट्टी होते. त्यांनी उरणसह परिसरात अनेक खेळाडू तयार केले आहेत. रा.स. पाटील यांचे सुपूत्र संदीप पाटील यांनीदेखील बुद्धीबळ खेळाची प्रेरणा आपल्या वडीलांकडून घेत शालेय जीवनापासून बुद्धीबळचे धडे घेतले आहेत. एएससी पनवेल महाविद्यालयापासून विद्यापिठ स्तरावर झालेल्या बुद्धीबळ स्पर्धेत त्यांनी सहभाग घेऊन आपल्या वडीलांचे नाव लौकीक केले आहे. संदीप पाटील आणि महाड येथील नायब तहसीलदार चंद्रकांत पाटील हे दोघेजण त्यावेळी सलग तीन वर्षे बुद्धीबळ खेळले आहेत.

## शोकसभेतून वाहिली आदरांजली

**रामदास सखाराम पाटील यांच्या निधनाची बातमी वाऱ्यासारखी पसरताच उरणसह रायगड जिल्ह्यातील क्रिडा, राजकीय, सामाजिक अशा अनेक क्षेत्रातील मंडळींसह ग्रामस्थ, मित्रमंडळी, नातेवाईकांनी बोकविरा गाठले. रा.स. पाटील गुरूजी यांच्या निधनाने मोठी शोककळा निर्माण झाली होते. त्यांच्या राहत्या घरी रविवारी (दि.१२) शोकसभा आयोजित करण्यात आली. या शोकसभेचे प्रमुख अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे तथा रा.उ. म्हात्रे होते. शेतकरी कामगार पक्षाचे नेते माजी आमदार बाळाराम पाटील, शिक्षक नेते, उद्योजक नरसू पाटील, बोकडविराचे माजी सरपंच भगवान पाटील, यशवंत ठाकूर. ना.तू. पाटील गुरुजी. भ.पो. म्हात्रे गुरुजी, खंडुेश्वर पाटील, माजी सरपंच मानसी पाटील, कॉ. हेमलता पाटील, माजी शिक्षिका सुरेखा पाटील, कुसुम ठाकूर, जेएनपीटी शिक्षिका योगसाधना पाटील, दिपक पाटील, नायब तहसीलदार चंद्रकांत पाटील, आगरी कवि पुंडलिक म्हात्रे, आगरी कवी काशिनाथ मढवी, कबड्डीपटू देवीदास पाटील (झुंझार कणे), ॲड. मच्छिंद्र ठाकूर, ॲड. मनोज पाटील, सुरेश म्हात्रे, जी.डी. पाटील, श्यामसुंदर पाटील, संतोष पवार, रमाकांत गावंड व राजेंद्र पाटील आदींनी शोक व्यक्त करीत पाटील गुरूजींना आदरांजली अर्पण केली.**

रामदास पाटील गुरुजींनी उरण तालुक्यात चेस तथा बुद्धीबळ असोसिएशनची स्थापना करून स्थानिक बुद्धीबळ खेळाडूंना हक्काचे व्यासपिठ मिळवून देन्याचे कार्य केले आहे. संदीप पाटील हे रायगड जिल्हा बुद्धीबळ संघटनेचे सचिव म्हणून कार्यरत असताना वेगवेगळ्या स्पर्धा घेऊन खेळाडूंना उभारी देण्याचा त्यांनी कायमच प्रयत्न केला होता. त्यांनी बुद्धीबळ खेळातून हजारो खेळाडू तयार केले आहेत. त्यामुळे घराघरात बुद्धीबळ खेळ खेळले जाणारे बोकडविरा गाव रायगड जिल्ह्यातील एकमेव गाव बोलणे वावगे ठरणार नाही.

राजकीय क्षेत्रातही त्यांची एक वेगळी पक्कड होती. कै.तू.ह. वाजेकर साहेब, माजी विरोधी पक्षनेते माजी आमदार ॲड. दत्ता पाटील (दादा), रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्ष प्रभाकर पाटील, भूमीपुत्रांचे आधार म्हणून ओळखले जाणारे लोकनेते दि.बा. पाटील साहेब तसेच रायगडच्या रणरागिणी माजी राज्यमंत्री दिवंगत मीनाक्षी पाटील यांच्या तालिमीतून रा.स. पाटील गुरुजी यांनी राजकारणाचे धडे घेतले. बोकवीरासह उरणमध्ये शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा फडकविण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे.

१९८४ सालच्या उरणमधील शेतकरी आंदोलनात त्यांचे योगदान राहिले आहे. कृषीवल वृत्तपत्रामध्ये सलग सात दिवस लिखाण करून त्यांनी या आंदोलनाची माहिती घराघरात पोहचविण्याचे काम केले. अलिबाग-पेझारी येथील दामोदर महादेव म्हात्रे (मेढेखार) यांच्यासोबत राहून त्यांनी हे काम केले. रा.स. पाटील यांचे सूपूत्र संदीप पाटील यांनी देखील आपल्या वडीलांकडून प्रेरणा घेत आंदोलनात सहभागी झाले होते. त्यावेळी ते दहावीला होते. तसेच, पाटील गुरुजींची पत्नी वनिता पाटील यादेखील आंदोलनात सक्रीय होत्या. सिडकोच्या आंदोलनात द्रोणगिरी रेल्वे ऐवजी बोकडवीरा नाव मिळावे, या लढ्यात देखील पाटील गुरुजी शेवटच्या क्षणापर्यंत सहभागी होते.

रामदास पाटील यांच्या दिर्घ आजारावर गेली तीन वर्षे आपोलो रुग्णालयात उपचार सुरु होते. जेएनपाटीच्या माध्यमातून त्यांना रुग्णालयात चांगली सेवा मिळाली. मात्र, आयुष्य भर विविध ठिकाणी संघर्ष करणारा हा योद्धा रविवार (दि.५) शांत झाला. पाटील यांचे उपचारादरम्यान निधन झाले.

शेतकरी कामगार पक्षाच्या लाल बावट्यामध्ये त्यांना गुंडाळून बोकड-उरणमधून भव्य अशी अंत्ययात्रा काढण्यात आली. या अंतयात्रेला मोठ्या संख्येने वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळींनी उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. यावेळी कामगार नेते कॉ. भूषण पाटील, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, माजी सरपंच जस रमाकांत म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, डी.आर. ठाकूर, मिमिक्री मॅन प्रफुल्ल पाटील, शरद पाटील, ग्रा.सु. मंडळाचे अध्यक्ष सुर्यकांत पाटील, गणपती देवस्थानचे ट्रस्टी मनोज पाटील, सेक्रेटरी श्रीकांत पाटील, रायगड भूषण यशवंत ठाकूर आदी मंडळी अंत्ययात्रेत सहभागी झाले होते.

रा.स. पाटील गुरुजी यांच्या पश्चात त्यांचा मुलगा संदीप पाटील, पराग पाटील, सुना अनिता पाटील, स्वाती पाटील, बहिण चंपाबाई पाटील, मुलगी प्रतिमा पाटील, जावई वासुदेव पाटील, पुतणे नरेश पाटील, रवींद्र पाटील, मेहुणे दिवाकर पाटील, सुधाकर पाटील यांच्यासह नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. पाटील यांचे उत्तरकार्य गुरुवारी (दि.१६) त्यांच्या राहत्या घरी बोकडविरा येथे होणार असल्याची माहिती संदीप पाटील यांनी दिली.रा.स. पाटील गुरुजी यांचा मुलगा संदीप पाटील हे जेएनपीटीमध्ये कार्यरत आहेत. वडीलांच्या पावलावर पाऊल ठेवत ते राजकीय, सामाजिक, क्रिडा व कामगार क्षेत्रात सक्रीय आहेत. वडीलांनी जपलेला बुद्धीबळ खेळ अधिक वृंद्धींगत करण्यासाठी ते प्रयत्न करीत आहेत. त्यांची आणखी एक ओळख म्हणजे ते आयुष्याच्या अखेरपर्यंत सायकल चालवत असत. ❋❋

## निवडक



### डोळवलीतील कंपनीत दरोडा

**खोपोली** : खालापूर येथील डोळवली परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटना घडत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच, या चोरट्यांना शोधणे पोलिसांसमोर आव्हान बनले असताना पुन्हा एकदा १५ ऑक्टोंबरच्या पहाटेच्या सुमारास येथील झोराबियन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत चोरीची घटना घडली आहे. जवळपास १० अज्ञात चोरट्यांनी कंपनीतील सुरक्षा रक्षकाला एका बंद खोलीत डांबून कंपनीच्या मुख्य ऑफिसचे लॉक तोडून आता प्रवेश केला. ऑफिसमधील साहित्याची तोडफोड करत कॅमेराचे डीव्हीआर आणि रोख रक्कम लंपास भीतीचे वातावरण पसरले आहे. मात्र, चोरटे सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले असून अधिक तपास खालापूर पोलीस करीत आहेत. दरोडा टाकण्यासाठी आलेल्या चोरट्यांमध्ये एक जण पोलीस गणवेशात असल्याने यामध्ये कोण कोण सामील आहे, याचा शोध खालापुर पोलीस घेत आहेत.

### तहसीलदारांना बोगस याद्या सुपूर्द

**उरण** : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षा भावना घाणेकर यांनी उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी उरण मतदार संघामध्ये



विधानसभा निवडणुकीपर्यंत असलेले बोगस मतदार, हटवलेले मतदार आणि नवे जोडलेले मतदार यांची जवळ जवळ साडेअकराशे पानांची यादी सुपूर्द केली. आक्षेप आणि सूचना करण्याची शेवटची तारीख असल्याने भावना घाणेकर यांनी तहसीलदारांकडे मतदार संदर्भात हरकती घेऊन विविध समस्या तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिल्या. यामध्ये उरण विधानसभेच्या निवडणुकीत जवळजवळ ६० हजाराहून अधिक मतदार हे बोगस मतदार असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यावर तहसीलदार उद्धव कदम यांनी सकारात्मक प्रतिसाद देत योग्य ती खबरदारी घेण्याचे आश्वासन दिले असून मतदारांची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे तहसीलदार यांनी आश्वासित केले आहे.

### बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई

**रायगड** : वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांवर जिल्हा वाहतूक शाखेने मंगळवारी (दि१४) कारवाई केली. या कारवाईत ३७६ चालकांकडून ३ लाख ५६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. त्यात हेल्मेट नसणे, वाहन वेगाने चालवणे, ट्रिपल सिट असणे, सिटबेल्ट न लावणे, जादा प्रवासी वाहतूक करणे अशा वेगवेगळ्या कारणांवरून वाहतूक शाखेने कारवाई केली. जिल्ह्यात नाक्यानाक्यावर वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले असून त्यांच्या माध्यमातून बेशिस्त वाहनचालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला जात आहे.



भारतीय बौद्ध महासभा खोपोली-काटरंग शाखेचा २१ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न. (छायाचित्र: प्रमोद जाधव)

## पोलादपूरच्या शिवमंदिरातील घंटांची चोरी



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

पोलादपूर तालुक्यातील सर्वात उंचावरील महादेवाचा मुरा येथील स्वयंभू शिवमंदिरात भाविकांनी नवसपूर्तीनंतर बांधलेल्या घंट्यांची चोरी झाल्याची घटना शुक्रवारी (दि.१०) रात्रीच्या सुमारास उघडकीस आली होती. या पूर्वी शहरातील शहरातील लोखंडी पुलाची चोरी झाल्यानंतर पोलीस तक्रारीनंतर दुसऱ्याच दिवशी चोरांनी लोखंडी पुलाचे अवशेष त्याच ठिकाणी आणून टाकल्याचे उघड झाले होते. त्याचधर्तीवर पोलादपूर पोलीस ठाण्याने याप्रकरणी गुन्हा दाखल करताच चोरीला गेलेल्या घंटा पुन्हा जागेवर ठेवण्यात येतील का, असा प्रश्न येथील ग्रामस्थांसमोर निर्माण झाला आहे.

तालुक्यातील महादेवाचा मुरा या गावाचा पर्यटन विकास करण्यासंदर्भात सर्वात आधी स्व. आ. माणिक जगताप यांनी पावले उचलली होती. त्यानंतर तत्कालीन पर्यटन राज्यमंत्री अदिती तटकरे यांनी महादेवाचा मुरा येथे रस्ता व पुलांची बांधणी करण्याकामी निविदा काढून काम सुरू करण्यास चालना दिली. ज्या शिवमंदिरामुळे महादेवाचा मुरा लोकवस्तीला पर्यटनाचा 'क' दर्जा प्राप्त झाला त्या शिवमंदिरातील पिंडीवरील आभूषणे आणि असंख्य लहानमोठ्या आकाराच्या घंटा चोरीला गेल्या आहेत. त्यामुळे पर्यटन विकासापूर्वीच मंदिरात चोरीची घटना घडल्याने मंदिराचे महत्व कमी करण्याच्या हेतूने हा प्रकार घडला असवा, अशी शक्यता व्यक्त होत आहे.

## कंत्राटी कर्मचारी मानधनाविना

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनाचा प्रश्न कायमच चर्चेत येत आहे. दिवाळी अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपली असताना देखील एनआरएचएम अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधनच देण्यात आले नसल्याचे समोर येत आहे. जिल्ह्यातील आरोग्य विभागात अपुऱ्या मनुष्यबळामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक वेगवेगळ्या विभागात करण्यात आली आहे. कंत्राटी कर्मचारी रात्रीचा दिवस करून आरोग्य सेवा देण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, त्यांना वेळेवर मानधन देण्यास प्रशासन शासन उदासीन ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे. एनआरएचएम अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ऑगस्ट महिन्याचे मानधन अद्याप मिळाले नसल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे. दिवाळीचा सण जवळ आला असताना देखील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या खात्यात मानधनाची रक्कम जमा झाली नसल्याने त्यांची दिवाळी अंधारातच जाण्याची चिंता व्यक्त केली जात आहे.



## अलिबाग-चौल रस्त्याला भगदाड

### शिवसेना ठाकरे गटाची मलमपट्टी

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

अलिबाग-चौल रस्त्यावरील मुखरी गणपती मंदिरा समोरील रस्त्याच्या मधोमध भले मोठे भगडदाड पडल्याची घटना घडली. येथील रस्त्याची मोरी जिर्ण व कमकुवत झाल्याने हे भगदाड पडले असून वाहनांच्या अपघातास निमत्रंण ठरत आहे. चौल शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या युवासेनाने त्यावर सिमेंट काँक्रिटने पक्की मलमपट्टी करून रस्त्यावरील भगदाड बुंजवले आहे. त्यामुळे त्यांच्या या कार्याचे कौतुक होत आहे. परंतु, येथील रस्त्याची मोरी जिर्ण व कमकुवत झाल्याने ही मलमपट्टी किती दिवस तग धरून बसेल, असा प्रश्न पस्थित केला जात आहे.

चौल-अलिबाग मुख्यः रस्त्यातील चौल मुखरी गणपती नजीकच्या रस्त्याच्या मधोमध भले मोठे भगदाड पडले. त्यामुळे या ठिकाणाहून वाहतुक करताना वाहनचालकांसह प्रवासी वर्गाला मोठी समस्या निर्माण होत होती. यादरम्यान, चौल शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी श्रमदानाने सिमेंट क्रॉकिटने रस्त्याला पडलेले भगदाड बुजविले व वाहतुकीचा मार्ग मोकळा केला. परंतु, या रस्त्यातील मोरी जुनी व जिर्ण झाली असून या रस्ताला खोलगट उतरता आकार प्राप्त झाला आहे. अशीच परिस्थिती राहिली तर भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता स्थानिकांमधून वर्तविली जात आहे. त्यामुळे संबंधित प्रशासनाने तातडीने या रस्त्याच्या नुतनीकरणाकडे तसेच मोरी दुरूस्ती व नुतनीकरणास प्राधान्य द्यावे, अशी मागणी स्थानिक, प्रवासी वर्ग व वाहन चालकांकडून केली जात आहे.

### जागरूक नागरिक म्हणून पत्रकारांनी काम करावे | पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांचे मत

## अलिबाग प्रेस असोसिएशनचा वर्धापनदिन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. पत्रकारांनी प्रशासन आणि समाज यांच्यातील दुवा म्हणून, एक जागरूक नागरिक म्हणून काम केले पाहिजे, असे मत रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी व्यक्त केले. अलिबाग प्रेस असोसिएशनचा १७ वा वर्धापनदिन बुधवारी (दि.१५) अलिबाग प्रेस असोसिएशनच्या कार्यालयात साजरा करण्यात आला. त्यावेळी पोलीस अधिक्षक आंचल दलाल बोलत होत्या.



अलिबाग प्रेस असो.च्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी पत्रकारांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष योगेश मगर, अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे, पत्रकार, छायाचित्रकार व वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.

याप्रसंगी पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी संवाद साधताना सांगितले की, पत्रकारांनी सत्य माहितीच्या आधारे निष्पक्ष बातम्या द्यायच्या असतात. जबाबदारीचे भान ठेवून काम करायचे असते. अलिबाग प्रेसने नेहमीच सामाजिक भान ठेवून तटस्थ आणि प्रामाणिकपणे बातमीदार म्हणून काम केले आहे. रायगडमध्ये पोलीस अधीक्षक म्हणून रुजू झाल्यावर इथल्या प्रसार माध्यमांनी खूप चांगले सहकार्य केले आहे. पोलीस दलाचे विविध उपक्रम लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पत्रकारांनी मदत केली. अनेक गोष्टींमध्ये मला व्यक्तिगत माहिती नसताना किंवा निर्णय घेताना, अलिबागमधील पत्रकारांनी चांगल्या सूचना केल्या. भविष्यात पोलीस दलाच्या कार्यप्रणालीत सुधारणा करण्याची आवश्यकता वाटल्यास पत्रकारांनी सूचना कराव्यात. योग्य सूचनांचे स्वागत करू, असे देखील आंचल दलाल म्हणाल्या.

यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार म्हणाले की, वाचनाची सुरूवात वृत्तपत्रापासून होते.तरुण पिढीने वृत्तपत्र वाचली पाहिजेत. तुम्ही कोणती वृत्तपत्र वाचता यावरून तुमची वैचारिकता समजते, असे त्यांनी सांगितले. वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश पोरे यांनी केले. अलिबाग असोसिएशनचे उपाध्यक्ष जितेंद्र शिगवण यांनी स्वागत केले. तर, सचिव राजेश भोस्तेकर यांनी आभार व्यक्त केले.

# मनाचे श्लोक, मनाच्या बाता

देशात आणि महाराष्ट्रात सध्या काही लोकांच्या मनाच्या बाता चालू आहेत. यांच्या मनात आले तर ते कशालाही धर्मविरोधी ठरवू शकतात. आमच्या भावना दुखावल्या म्हणून बोंब ठोकू शकतात. यांचे रस्त्यावर येणारे लोक पाच-दहाच असतात. पण देवेंद्र फडणवीसांचे पोलिस आणि सरकार त्यांच्याच बाजूने असते. त्यामुळे नागरिकांना गपगुमान ते म्हणतील तसे वागावे लागते. मनाचे श्लोक नावाचा एक मराठी चित्रपट गेल्या आठवड्यात पुण्यात प्रदर्शित होणार होता. त्याच्या नावाला एका हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्या संघटनेने आक्षेप घेतला. या संघटनेचे एरवी नावही कधी कोणी ऐकलेले नव्हते. चित्रपटाचा खेळ बंद पाडायलाही अशीच दहा-वीस टाळकीच जमा झाली होती. चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार या पहिल्या प्रदर्शनासाठी हजर होते. हे कलाकार मोठे नाववाले आहेत. त्यांना समाजात प्रतिष्ठा आहे. तरीही ते या अज्ञात संघटनेच्या गुंडगिरीसमोर झुकले. कारण, त्यांना ठाऊक होते की, या गुंडांच्या मागे देवेंद्र फडणवीस यांचे पोलिस आणि सरकार छुप्या रीतीने उभे आहे. समजा त्यांनी यात पोलिसांना हस्तक्षेप करण्याची विनंती केली असती तरी ती कितपत यशस्वी झाली असती ही शंकाच आहे. त्यामुळे या चित्रपटकर्त्यांनी शरणागती पत्करली. आता हा चित्रपट नव्या नावानिशी उद्या प्रदर्शित होणार आहे. रामदासस्वामींनी अचपळ, न आवरणाऱ्या मनाला वेसण घालण्यासाठी मनाचे श्लोक लिहिले. पण त्यांचे नाव सांगून दांडगाई करणाऱ्यांना आवरणे अशक्य झाले आहे. मनाचे श्लोक या चित्रपटाला सेन्सॉरने संमत केले होते. त्याच्या नावाला आक्षेप घेणारी याचिका न्यायालयानेही फेटाळली होती. तरीही झुंडीने दबाव टाकून स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्यांनी आपल्याला हवे ते करवून घेतले. यामुळे त्यांच्या पाठीराख्यांना मोठा विजय झाल्यासारखे वाटत असेल. धर्माचा व आपल्या श्रध्दांचा कोणीही अपमान करू शकत नाही असा अहंकारही ते मिरवू शकतील. पण खुद्द रामदासस्वामी आज असते तर त्यांनी या लोकांकडे पाहून मूर्खांची आणखी काही लक्षणे लिहिली असती.

## लोकभाषेची परंपरा

रामायण, महाभारत, पुराणे, संतांच्या रचना या सर्वांना परिचित आहेत. त्यामुळे माणसे व्यवहारात बोलताना त्यांचा अनेकविध प्रकारे वापर करतात. उदाहरणार्थ, एखादी मोठी कौटुंबिक घडामोड झाली तर इतके सगळे रामायण झाले असे म्हटले जाते. यामुळे रामाचा अपमान वगैरे होत नसतो. हे सगळ्यांना कळते. सरपंचांच्या निवडीवरून गावात मोठे महाभारत झाले असेही म्हटले जाते. देवांचा संदर्भ देऊन तर आपल्या भाषेमध्ये कितीतरी उलटसुलट शब्दप्रयोग केले जातात. नारद हा मोठा विष्णुभक्त मानला जातो. पण कुटील कारवाया करणाऱ्यांसाठी कळीचा नारद किंवा कळलाव्या नारद हे विशेषण रुढ झाले आहे. कृष्णाचे नावही कपट वा कारस्थाने यांच्याशी जोडले जाते. कृष्णाच्या लीला यांनाही वेगवेगळे अर्थ प्राप्त आहेत. विठोबासारखा हात कमरेवर ठेवून काय उभा आहेस असे काही काम न करणाऱ्याला विचारले जाते. त्या मानाने रामदासांचे मनाचे श्लोक हे तर केवळ त्यांच्या एका रचनेचे शीर्षक आहे. त्यात कोण्या देवाचे नाव वगैरे नाही. मराठी साहित्यात अनेकदा मनाचे श्लोक या शब्दप्रयोगावर कोट्या झाल्या आहेत. उदाहरणार्थ, बॉसचे किंवा बायकोचे मनाचे श्लोक सुरू झाले असे सर्रास म्हटले गेले आहे. मनाचे श्लोक या नावाने काही विडंबनेही झाली आहेत. मंगेश पाडगावकरांनी राम दासांच्या दासबोधाच्या धर्तीवर आधुनिक काळासाठी उदासबोध लिहिला व त्यात सर्वांची यथेच्छ खिल्ली उडवली. सुदैवाने पूर्वीच्या काळात असल्या फालतू हिंदुत्ववादी संघटना नव्हत्या. त्यामुळे अशा शब्दप्रयोगांमुळे आपल्या भावना दुखावल्या असे कोणालाही वाटत नव्हते. मनाचे श्लोक या चित्रपटात मूळ मनाच्या श्लोकांचे विडंबन वगैरे असते किंवा रामदासस्वामींवर काही भाष्य असते तर एक वेळ समजण्यासारखे होते. पण हा साधा प्रेमाची गोष्ट सांगणारा चित्रपट आहे. लोकांचे लक्ष वेधण्यासाठी त्याचे शीर्षक मनाचे श्लोक असे ठेवण्यात आले असावे. एका अर्थाने निर्मात्याचा उद्देश सफल झाला व प्रसिध्दी मिळाली. पण शेवटी नाव बदलावे लागले व प्रदर्शन पुढे ढकलावे लागून मोठा आर्थिक फटकाही बसला.

## धर्माच्या नावाने गुंडगिरी

या निमित्ताने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा पुन्हा एकवार पुढे आला. या चित्रपटाचे निर्माते व दिग्दर्शक यांनी थोडा ताठ कणा दाखवायला हवा होता अशी टीका त्यांच्यावर होत आहे. पण झुंडीसमोर न झुकण्याची किंमत मोजावी लागते. प्रत्येकामध्ये ही धमक असतेच असे नाही. शिवाय, मुळात मनाचे श्लोक या नावामध्ये किंवा चित्रपटाच्या कथानकात काही फार बंडखोरी होती असेही नाही. त्यामुळे ते बदलले म्हणून फार फरक पडणार नाही असा विचार बहुदा दिग्दर्शक इत्यादींनी केला असावा व आपले आणखी नुकसान टाळले असावे. मात्र हे सर्व घडताना देवेंद्र फडणवीसांचे सरकार गप्प बसून होते हे नोंदवण्यासारखे आहे. एरवी शक्तिपीठासारख्या प्रकल्पाच्या विरोधात चार जण जमले तरी त्यांच्यावर लाठीमार केला जातो. आंबेडकर पुतळ्याची विटंबना झाल्याच्या निषेधार्थ परभणीत दलित समाजाने मोर्चा काढला तर त्यावर बेछूट लाठीमार झाला. त्यात एकाचा व नंतर कोठडीत आणखी एकाचा मृत्यू झाला. मुस्लिम समाजाबाबतही हेच घडते. दिल्लीत शेतकरी आंदोलकांना पुढे येता येऊ नये म्हणून रस्त्यात खिळे ठोकण्यात आले होते. कोकणात नाणार प्रकल्पविरोधकांनाही असेच क्रूरपणे वागवले गेले होते. तथाकथित हिंदुत्ववाद्यांना मात्र कसेही वागण्याची सूट दिली जाते. उलट त्यांना थेट किंवा आडून पोलिस संरक्षण दिले जाते. मागे शाहरुख खानच्या एका सिनेमात दीपिकाने भगव्या रंगाची बिकिनी घातली आहे हा आपला अपमान आहे असे म्हणून एका संघटनेने हैदौस घातला होता. केरळात चित्रपटांमधील सीता व जानकी ही नावे बदलण्याची सूचना करण्यात आली होती. स्वतःला हिंदुत्ववादी, धार्मिक श्रध्दांचे रक्षणकर्ते वगैरे मानणारे हे लोक एरवी गप्प असतात. स्त्रियांवर होणारे अत्याचार, त्यांना रोज सहन करावा लागणारा त्रास, सार्वजनिक ठिकाणच्या मारामाऱ्या, गणशोत्सव, नवरात्र अशा सणांमध्ये दारु पिऊन घातला जाणारा गोंधळ, शिवीगाळ, नेत्यांची गुंडगिरी, राजकारणातला भ्रष्टाचार, तमाम सर्व मंदिर समित्यांमधील भानगडी, बुवा, बाबा, महाराज, कीर्तनकार यांचे घाणेरडे उपद्व्याप व पैशांचे गैरव्यवहार, भक्तीच्या नावाने चाललेली लुटालूट याबाबत या तथाकथित हिंदुत्ववादी लोकांना काहीही म्हणायचे वा करायचे नसते. उलट अनेक भोंदू महाराजांच्या बैठका, सभे, प्रवचने, सत्संग, धार्मिक कार्यक्रम यांच्यामध्ये ते मिरवत असतात. या सर्वांना सत्तेचा कैफ चढला आहे. देशात आपले सरकार आहे व आपण म्हणू तो धर्म, आपण म्हणू ती श्रध्दा, आपण म्हणू तो श्रध्देचा अपमान असे त्यांना वाटू लागले आहे. मनाचे श्लोकसारखा चित्रपट बंद पडला की यांचा कैफ आणखी वाढत असतो. सर्वसामान्य शहाण्या लोकांनीच यांची ही धुंदी उतरवायला हवी.

---

विचार

# भारत-अफगाणिस्तान संबंध दृढ होणार

*अफगाणिस्तानच्या तालिबान राजवटीचे परराष्ट्रमंत्री अमीर खान मुत्ताकी लवकरच भारत दौऱ्यावर येत आहेत. एके काळी अमेरिकेच्या जवळ असलेले अफगाणिस्तान आणि भारत आता अमेरिकेपासून दुरावत चालले आहेत. रशियाशी त्यांची मैत्री दृढ होत आहे. तालिबान राजवटीच्या काळातही अफगाणिस्तान आणि भारताचे संबंध चांगले राहिले असून, मुत्ताकी यांच्या दौऱ्यानिमित्ताने ते आणखी दृढ होणार आहेत.*



प्रा. जयसिंग यादव

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने दहशतवादी पार्श्वभूमी लक्षात घेऊन तालिबानी नेत्यांवर विदेशप्रवासाला बंदी घातली होती. चार वर्षांनंतर हे निर्बंध प्रथमच उठवण्यात आले. त्यामुळे अफगाण तालिबान नेते इतर देशांमध्ये प्रवास करू शकतात. २०२१ मध्ये तालिबानने अफगाणिस्तान ताब्यात घेतल्यापासून तालिबान सरकारच्या एखाद्या मंत्र्याचा हा पहिलाच अधिकृत भारत दौरा असेल. भारताने अद्याप तालिबान सरकारला मान्यता दिलेली नाही; परंतु अलिकडच्या काळात दोन्ही देशांमधील संपर्क वाढला आहे. मे २०२५ मध्ये काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी तालिबान सरकारच्या परराष्ट्र मंत्र्यांशी फोनवरून चर्चा केली. भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी जानेवारी २०२५ मध्ये मुत्ताकी यांची भेट घेतली होती. आता मुत्ताकी यांचा दौरा भारत आणि अफगाणिस्तानसाठी एक महत्त्वाचा राजनैतिक क्षण आहे. भारताने भूतकाळात अफगाण तालिबानला विरोध करणाऱ्या गटांना पाठिंबा दिला होता. तालिबानला पाकिस्तानचे हत्यार मानले जात होते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काबूलजवळील बगराम हवाई तळ घेण्याची घोषणा केल्यानंतर मुत्ताकी यांचा भारत दौरा होत आहे. मुत्ताकी यांचा दौरा सध्या महत्त्वाचा आहे, कारण अफगाणिस्तानमध्ये चीनचा प्रभाव वाढत आहे. रशियानेही तालिबानशी राजनैतिक संबंध वाढवले आहेत. पहलगाम हल्ल्याच्या वेळी भारताने अफगाणिस्तानवर हल्ला केला, असा कांगावा पाकिस्तानने केला; परंतु अफगाणिस्तानातील तालिबान सरकारने ते लगेच नाकारले.

पाकिस्तानी सरकारशी तालिबानची जवळीक होती; परंतु आता सीमावादामुळे तालिबान आणि पाकिस्तानमधील संबंध बिघडले आहेत. अशा वेळी मुत्ताकी यांचा भारत दौरा होत आहे. अफगाण आघाडीवर सध्या बरेच काही घडत आहे. हे या वस्तुस्थितीकडे निर्देश करते की तालिबान सत्तेत आल्यापासून भारताने त्यांच्याशी अतिशय सावधपणे ठेवलेल्या संबंधाचे हे परिणाम आहेत. २०२१ पर्यंत जगभरातील विविध देशांनी तालिबानशी संपर्क साधण्यास सुरुवात केली; परंतु भारताने तसे करण्यास उशीर केला. भारत पूर्वी तालिबानपासून अंतर ठेवत असे; परंतु आता तशी परिस्थिती नाही. तालिबान सत्तेत आल्यानंतर भारताने आपले राजनैतिक कर्मचारी मागे घेतले आणि थेट संपर्क थांबवला; परंतु नंतर भारताने लगेचच आपली रणनीती बदलली. तेव्हा भारताला जाणवले, की तालिबानपासून पूर्णपणे दूर राहणे अशक्य आहे. त्यानंतर भारताने पडद्यामागील चर्चा सुरू ठेवल्या. आपल्या भूभागाचा वापर भारतविरोधी कारवायांसाठी करू देणार नाही, हे आश्वासन भारताने त्यांच्याकडून मिळवले. तालिबानपासून पूर्ण अंतर राखण्याचे धोरण व्यावहारिक नाही हे भारताला समजले आहे. तालिबान सरकारला मान्यता न देता मदत करणे आणि भागीदारीशिवाय तेथे उपस्थित राहणे भारताच्या तालिबानबद्दलच्या धोरणात संतुलन दर्शवते. जानेवारी २०२५ मध्ये विक्रम मिस्री यांनी मुत्ताकी यांची भेट घेतली, तेव्हा भारत तालिबान सरकारच्या जवळ जात असल्याचे संकेत मिळाले होते.

पहलगाम हल्ल्यानंतर मे २०२५ मध्ये दोन्ही परराष्ट्र मंत्र्यांनी फोनवर चर्चा केली. त्यातून एस. जयशंकर आणि मुत्ताकी यांच्यातील या संभाषणानंतर दोन्ही देशांनी जारी केलेल्या निवेदनांमध्ये त्यांच्या राष्ट्रीय प्राधान्यांचे प्रतिबिंब पडले. भारताने राष्ट्रीय सुरक्षेचा उल्लेख केला, कारण अफगाणिस्तान पुन्हा कधीही भारतविरोधी अतिरेकी गटांसाठी सुरक्षित आश्रयस्थान बनू नये अशी भारताची इच्छा आहे, तर अफगाणिस्तानने आंतरराष्ट्रीय मान्यता आणि गुंतवणूक मिळवण्यासाठी व्हिसा आणि व्यापाराची कारणे दिली. भारताचे अफगाणिस्तानमध्ये अनेक हितसंबंध आहेत, जे दुर्लक्षित केले जाऊ शकत नाहीत. विशेषतः तालिबानविरोधी गट विखुरलेले असतात आणि त्यांना जागतिक शक्तींकडून पाठिंबा मिळत नाही, तेव्हा परिस्थिती महत्वपूर्ण बनते. भारत अफगाणिस्तानमध्ये आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी तालिबान सरकारशी जवळीक वाढवत आहे. त्याच वेळी आपल्या माजी अफगाण मित्रांनाही वेगळे करत आहे. भारताला अफगाणिस्तानमधील मानवी हक्कांच्या परिस्थितीबद्दल चिंता आहे; परंतु असे असूनही तो तालिबानकडे दुर्लक्ष करू शकत नाही. भारताच्या प्रादेशिक सुरक्षेच्या चिंता अफगाण तालिबानशी संबंधित आहेत. यामध्ये पाकिस्तानी गुप्तचर संस्थांकडून तालिबान आणि इतर सशस्त्र गटांचा 'प्रॉक्सी' म्हणून वापर करण्याबद्दलची चिंता महत्वाची आहे. भारत अफगाणिस्तानमध्ये चीनचा प्रभाव कमी करण्यासाठी दीर्घकालीन गुंतवणूक पर्यायांवरही विचार करत आहे. भारताने मध्यम मार्ग स्वीकारला असून तालिबानला पाठिंबा देण्याचा प्रयत्न करत आहे. औपचारिक मान्यता न देता त्याने तालिबानशी मर्यादित परंतु अर्थपूर्ण संबंध सुनिश्चित केले आहेत.

हा दृष्टिकोन संवादाचे मार्ग खुले ठेवतो आणि अफगाणिस्तानला भारतविरोधी दहशतवादी गटांचे आश्रयस्थान बनण्यापासून रोखतो. तालिबानी परराष्ट्रमंत्र्यांच्या भेटीतून तालिबान पाकिस्तानची कठपुतली नाही, हे जगाला दाखवण्याचा प्रयत्न करत आहे. भारताची तालिबानशी जवळीक असल्याचे काही नकारात्मक पैलूदेखील आहेत. यामुळे अफगाण नागरिकांमध्ये पाकिस्तान आणि भारत दोघेही अफगाणिस्तानचा वापर युद्धभूमी म्हणून करत आहेत, अशी धारणा बळकट होऊ शकते. मुत्ताकी यांची भेट निःसंशयपणे संबंध वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असेल. २२ एप्रिल रोजी पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २२ पर्यटक ठार झाले. त्यामुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला. भारत सरकारने दहशतवाद्यांविरोधात 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले. भारतीय लष्कराने अनेक दहशतवाद्यांचा खात्मा केला. त्या वेळी जयशंकर यांनी मुत्ताकी यांच्याशी पहिल्यांदाच फोनवरून चर्चा केली. संभाषणादरम्यान, त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की एके काळी तालिबानचा मित्र असलेला पाकिस्तान आता तालिबानसाठी तणावाचे कारण बनला आहे. त्यामुळे भारत-अफगाणिस्तानमध्ये त्यांच्या समर्थकांना एकत्रित करण्यासाठी तालिबानशी संवाद साधण्यास प्रवृत्त झाला आहे. भारताने तालिबानशी औपचारिक राजनैतिक संबंध प्रस्थापित केले नव्हते; परंतु तालिबानविरोधी गट, 'नॉर्दर्न अलायन्स'ला पाठिंबा दिला होता. १९९९ मध्ये इंडियन एअरलाइन्सच्या विमानाच्या अपहरणकर्त्यांशी वाटाघाटी करण्यात तालिबानने भारताला मदत केल्याने प्रवाशांचे सुरक्षित परतणे शक्य झाले.

मध्य आशियामध्ये लक्षणीय आर्थिक आणि ऊर्जा संसाधने आहेत. पाकिस्तान आणि चीनवरील अवलंबित्व टाळून चाबहार बंदरातून या संसाधनांपर्यंत जाण्यासाठी अफगाणिस्तान भारताला सोयीस्कर मार्ग प्रदान करतो. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की भारताने अफगाणिस्तानमध्ये रस्ते, धरणे, शाळा, रुग्णालये आणि संसद भवन यासह विविध प्रकल्पांमध्ये तीन अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे. त्यामुळे अफगाणी जनतेचे जीवन सुधारू शकते आणि भारतीय आणि अफगाण दोघांनाही परस्पर फायदे मिळू शकतात. भारत आणि अफगाणिस्तानदरम्यान बरेच चांगले व्यापार संबंध आहेत. भारत अफगाणिस्तानमधून मोठ्या प्रमाणात विविध वस्तू खरेदी करतो. अफगाणिस्तानमधून फळे, मसाले, काजू आणि कांदे यासह विविध प्रकारच्या वस्तू अफगाणिस्तानमधून भारतात येतात. डाळिंब, सफरचंद, चेरी, कॅन्टलूप, टरबूज, हिंग, जिरे आणि केशरसारखे मसाले आणि मनुका, अक्रोड, बदाम, अंजीर, पाइन नट्स, पिस्ता आणि जर्दाळू यासारख्या वस्तूदेखील आयात होतात. २०२३ मध्ये अफगाणिस्तानमध्ये आलेल्या भूकंपाप्रसंगी भारताने भरीव मदत केली हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्यापूर्वी, कोविड-१९ साथीच्या काळात भारताने लसीकरणाचे योगदान दिले आणि मानवतावादी मदतही दिली. अशीच मदत देऊनही दहशतवादविरोधी मुद्द्यांवर भारताला पाठिंबा देण्याऐवजी तुर्कस्तान पाकिस्तानचा समर्थक राहिला. या पार्श्वभूमीवर भारत आणि अफगाणिस्तानचे संबंध वाढवणे महत्त्वाचे होते. ते येत्या काळात घडेल, असे वाटते.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

---

# रायगड जिल्हा अल्पवयीन प्रसूतीच्या संकटात

संतोष राऊळ

गेली दोन हजार वर्षे बालविवाहाची चाल केवळ स्थिर न होता पक्की होत गेली. तसेच, विवाहाचे वय अधिकाधिक कमी होत गेले. पाळण्यातील मुलामुलींचे विवाह लावण्यापर्यंतही मजल गेली; इतकेच नव्हे तर दोन गरोदर स्त्रियांपैकी एकीला मुलगा व दुसरीला मुलगी होईल, असे गृहीत धरून देखील लग्न ठरवले जाई. एकोणिसाव्या शतकात समाजसुधारणेच्या चळवळी सुरु झाल्या. त्यात बालविवाहाचा प्रश्न अतिशय तीव्रपणे चर्चिला गेला. राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, केशवचंद्र सेन या बंगाली व जोतीराव फुले, म.गो. रानडे, गो.ग. आगरकर, धो.के. कर्वे या मराठी समाजसुधारकांनी बालविवाहाच्या विरूद्ध मोहीम उघडली. त्यांनी स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला. बेहरामजी मलबारी, लाला गिरिधारीलाल, रायबहादुर बक्षी सोहनलाल, हरी सिंग गौर, हरविलास सारडा यांनी कायदा करून सुधारणा करावी या मताचा पुरस्कार केला व त्यांपैकी काहींनी कायदेमंडळात बालविवाहबंदीची विधेयकेदेखील आणली. त्यानंतर अनेक कायदे निघाले. त्यातील २००६ च्या कायद्यात भारतात मुलींचे वय १८ आणि मुलांचे वय २१ पेक्षा कमी असू नये असे सांगण्यात आले. कायदा मोडल्यास दोन वर्षांपर्यंत सक्त मजुरी आणि १ लाख रुपयांपर्यंत दंड अशी शिक्षा होऊ शकते. परंतु, असे असतानाही राज्यासह रायगड जिल्ह्यात बाल विवाह होत आहेत. महिला व बाल विकास विभागाच्या मंत्री आदिती तटकरे या स्वतः रायगड जिल्ह्यातील असून रायगडमधील बालविवाहासह अल्पवयीन मातांच्या प्रसूतीची वाढती संख्या चिंताजनक असल्याचे जनतेमधून बोलले जात आहे.

लग्न लागायच्या वेळी जर मुलगी किंवा मुलगा यांच्यापैकी कुणाचेही वय कायद्याला मान्य असलेल्या वयापेक्षा कमी असेल तर त्यांचा विवाह बालविवाह ठरतो. पूर्वी काही समाजात मूल जन्माला यायच्या आधीच त्याचे आपल्या नात्यात लग्न ठरवून टाकले जात असे. तशा शपथा जातीच्या पंचांसमोर घेतल्या जात होत्या. आजही काही प्रमाणात असे प्रकार होताना अढळून येतात. जिल्ह्यातील ग्रामिण भागात विशेष करून आदिवासी भागांमध्ये १४ ते १७ वर्षे वयोगटातील मुलींचे लग्न लावले जात असल्याचे बोलले जात आहे. मुलींच्या सुरक्षेची भीती व्यक्त करण्याबरोबरच सामाजिक दबाव, अंधश्रद्धा इत्यादी कारण दाखवून अल्पवयीन मुलींचे लग्न लावले जाते. त्यामुळे लहान वयातच माता बनण्याची वेळ या अल्पवयीन मुलींवर येते. परंतु, बालविवाह झालेल्या मुलींचा लैंगिक विकास पुरेसा झालेला नसतो. अशा स्थितीत १८ वर्ष गाठायच्या आतच त्यांना गर्भधारणा झाली तर बाळाच्या पोषणासाठी अजिबातच सक्षम नसलेले शरीर, घरातल्या कामाचे ओझे आणि त्यातच अपुरे पोषण या साऱ्यांचे वाईट परिणाम त्या बाळाच्या आरोग्यावर होते. तसेच, लहान वयात लग्न झाल्यामुळे आपल्या लैंगिकतेविषयी पुरेसे ज्ञान या मुलींना नसते. कुटुंबनियोजन, गर्भधारणा आणि गर्भारपणात घ्यायची काळजी हे तर फारच दूरचे विषय असतात. त्यामुळे त्यांना कधीकधी आपले बाळ जगात येण्याआधी, कधी जन्मानंतर लगेच, तर कधी जन्मानंतर एक-दोन वर्षात गमवावे लागते. बालविवाह हा कायद्याने गुन्हा तर आहेच, परंतु आजच्या काळात हे असे घडणे म्हणजे नवीन विचार शक्तीला काळिमा फासण्यासारखे आहे, असे जनतेतून बोलले जात आहे. रायगड जिल्ह्यात गेल्या नऊ महिन्यांत अल्पवयीन मातांच्या प्रसूतीची धक्कादाय आकडेवारी समोर आली आहे. जिल्ह्यात अशी एकूण १४७ प्रकरणे समोर आली आहेत. त्यामुळे अल्पवयीन मातांची अधिकृत संख्या एवढी असेल तर जगासमोर न आलेली संख्या किती असेल, असा प्रश्न जनतेला पडला आहे. आणि यापेक्षा कितीतरी जास्त संख्या बालविवाहांची असू शकते, असे तर्क देखील लावले जात आहेत. रायगड पोलीस दलाच्या हद्दीतील १३ पोलीस ठाण्यांमध्ये बालविवाहप्रकरणी २५ गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये अलिबागसह मांडवा सागरी, पोयनाड, मुरूड, रोहा, कोलाड, नागोठणे, तळा, वडखळ, पाली, म्हसळा, रसायनी व महाड या तालुक्यांचा समावेश आहे. रायगड जिल्ह्याला इतर जिल्ह्यांच्या तुलनेने एक सुशिक्षित जिल्हा म्हणून ओळखला जातो. कायद्याचे पालन करण्याबरोबरच वेगवेगळ्या योजनांची अंमलबजावणी करण्यामध्ये रायगड जिल्ह्याचा सिंहाचा वाटा राहिला आहे. तसेच, महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासह सुरक्षेचा गाजावाजा महिला व बाल विकास विभागामार्फत कायमच करण्यात आला आहे. प्रत्यक्षात मात्र त्याकडे दुर्लक्ष असल्याचे समोर येत आहे. नवल म्हणजे महिला व बाल विकास विभागाच्या मंत्री आदिती तटकरे या रायडच्याच आहेत. असे असतानाही त्यांच्याच जिल्ह्यात अशा गंभीर घटना घडत असतील तर राज्यात काय परिस्थिती असेल, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे रायगडच्या बाल विकास विभागाच्या मंत्री आदिती तटकरे या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देतील का, असा सवाल जनतेकडून उपस्थित केला जात आहे.

---

लोकसंसद

## मोबाइल फोन निर्यातीत भारताची उत्तुंग भरारी!

इंडिया सेल्युलर अँड इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशन (आयसीईए) या संस्थेच्या एका प्रसिद्धीपत्रकानुसार, भारताच्या मोबाइल फोन निर्यातीने उत्तुंग भरारी घेतली असून सप्टेंबर २०२४ च्या तुलनेत सप्टेंबर २०२५ मध्ये स्मार्टफोन निर्यात अंदाजे १.८ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाली आहे. सप्टेंबर २०२४ च्या तुलनेत ही वार्षिक वाढ ९५ टक्क्यांहून अधिक आहे. यावरून भारतातील मोबाईल फोन उत्पादन क्षेत्र जागतिक स्पर्धात्मकतेच्या आधार असलेल्या 'प्रमाण', 'कार्यक्षमता' आणि 'विश्वासार्हता' या तीन महत्वाच्या गोष्टींच्या कसोटीस उतरल्याचे आयसीईएच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. भारतीय मोबाइल फोन प्रामुख्याने अमेरिका, युएई, ऑस्ट्रिया, नेदरलँड्स आणि युनायटेड किंग्डम या देशात निर्यात केले जातात. विशेष म्हणजे एकूण निर्यातीपैकी अमेरिकेचा वाटा सुमारे ७० टक्के असून गेल्या वर्षीच्या याच कालावधीत तो ३७ टक्के होता. आयसीईएच्या अंदाजानुसार २०२४-२५ या आर्थिक वर्षात २४.१ अब्ज अमेरिकन डॉलर्स असलेली मोबाइल फोनची निर्यात २०२५-२६ या आर्थिक वर्षात अंदाजे ३५ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचेल. एकेकाळी मोबाइल फोनचा आयातदार असलेला भारत देश आता निर्यातदार बनला असून जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा मोबाइल फोन उत्पादक बनला आहे. भारतात विकले जाणारे जवळजवळ सर्व फोन (९९.२ टक्के) आता देशातच बनवले जात आहेत. फोन निर्यातीत भारताने भरारी घेतल्याने ॲपल, सॅमसंग, शाओमी अशा अनेक प्रमुख आंतरराष्ट्रीय ब्रँड्सनी भारतात असेंब्ली आणि उत्पादन वाढवले आहे.



**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

दिनविशेष

# जागतिक अन्न दिन



१९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या स्थापनेच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक अन्न दिन साजरा केला जातो. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की अन्न उत्पादन आणि वितरणात सतत प्रगती होत असूनही, भूक आणि कुपोषण ही जागतिक स्तरावरील महत्त्वाची आव्हाने आहेत. जागतिक अन्न दिन आपल्याला आठवण करून देतो की जागतिक अन्न आणि पाणी सुरक्षा साध्य करण्यात आपल्या सर्वांची भूमिका आहे. आपण लहान पावले उचलून प्रत्येकाला पुरेसे अन्न आणि स्वच्छ पाणी मिळेल याची खात्री करू शकतो.

शिवाय, ही संसाधने केवळ जीवन टिकवून ठेवत नाहीत तर तुमच्या एकूण आरोग्यावरही त्यांचा थेट परिणाम होतो. आज, तुमच्या आरोग्याचे रक्षण करणे तितकेच महत्त्वाचे आहे. चांगले पोषण आणि स्वच्छ पाणी हे आरोग्य राखण्यासाठी आवश्यक आहे. तथापि, अनपेक्षित आरोग्य आव्हाने अजूनही उद्भवू शकतात. तिथेच आरोग्य विमा आवश्यक बनतो. योग्य आरोग्य विमा असण्यामुळे तुम्हाला अनपेक्षित वैद्यकीय खर्चापासून संरक्षण मिळते, विशेषतः जेव्हा कुपोषण किंवा पाण्यामुळे होणारे आजार यासारख्या गुंतागुंती असुरक्षित लोकसंख्येवर परिणाम करतात.


अन्न सुरक्षेबाबतची एकंदर परिस्थिती पाहता अन्न दिनाबाबत जागरुकता वाढीस लागण्याची गरज आहे. अन्नधान्य मुबलक मिळायला हवे, मात्र ते स्वस्तातच हवे अशी अपेक्षा दारिद्र्यरेषेखालील माणसांपासून ते श्रीमंतांपर्यंत सर्वांचीच असते. मध्यम वर्गीयांना तर बाकी काही महागले तरी चालते, पण अन्नधान्य मात्र स्वस्तातच मिळायला हवे असते. आपल्याला पगार भरपूर मिळावा, मात्र वर्षानुवर्षे मातीत राबणाऱ्या शेतकऱ्याने मात्र पंधरा-वीस वर्षांपूर्वीच्याच भावात अन्नधान्य द्यावे असे या वर्गाला वाटत असते. बाजारभावाच्या निम्म्याहून कमी पैसे शेतकऱ्याच्या हातात पडतात हे वास्तवही त्यांना नीट माहीत नसते, किंबहुना ते जाणून घेण्याची निकडही त्यांना भासत नाही. तापमानवाढ, मोसमी पावसाची अनियमितता, रोग-किडींचा वाढता प्रादुर्भाव, खते-बियाण्यांसह अन्य कृषी निविष्ठांची अपुरी उपलब्धता, बाजार यंत्रणेकडून होणारी फसवणूक अशी अनेक आव्हाने खांद्यावर घेऊन शेतकरी काळ्या आईची सेवा मनोभावे करतो आहे. तो नवी आव्हाने पेलण्यासही समर्थ आहे, पण किमान पाठीवर हात ठेवून 'ल' म्हणण्याइतके औदार्य समाजाने दाखवायला हवे. सरकारी यंत्रणेनेही त्याच्याप्रती असलेले औदासिन्य सोडायला हवे. निविष्ठांपासून ते पीक कर्जापर्यंत साऱ्या बाबीची वेळेत पूर्तता करून द्यायला हवी. 'अन्नदाता सुखी भव' म्हणून आपण यजमानांना दुवा देत असतो, पण खरा अन्नदाता शेतकरी आहे याच विसर सर्वांनाच पडलेला असतो. या जगाच्या पोशिंद्याचे कल्याण करायचे असेल तर त्याने पिकवलेल्या मोत्यांना वाजवी किंमत देण्याची दानतही समाजाने अंगी बाळगली पाहिजे. सध्या जगातील अनेक देश दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत आहेत. त्या देशांतील लोकांना दररोज संतुलित आहार मिळत नाही. सोप्या शब्दात सांगायचे तर लोकांना संतुलित आहार मिळत नाही. त्यामुळे बहुतांश लोक कुपोषित होतात. ते इतर अनेक आजारांनाही बळी पडतात. कुपोषणामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात लोकांचा मृत्यू होतो. यासाठी दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात जागतिक अन्न दिन साजरा केला जातो.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१६ ऑक्टोबर**

१) श्री. वामन दामोदर पाटील
अलिबाग, १६-१०-१९३७
२) श्री.वसंत परशुराम वर्तक
वरसोली, अलिबाग
१६-१०-१९५२
३)श्री.ॲड.कृष्णा दाजीबा पाटील
ब्राम्हणआळी, अलिबाग
१६-१०-१९५६
४)श्री.यशवंत लक्ष्मण राणे
मु.आवास, अलिबाग
१६-१०-१९४८

## सुवर्णकण



इंद्रियाच्या अधीन न होण्याच्या प्रयत्नात राहणे हे प्रत्येक साधकाचे कर्तव्य आहे. अशा प्रयत्नांमुळे पुण्याची जोड होते. आणि पुढील प्रत्येक जन्म विकासाच्या वरच्या पायरीवर होतो.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय
आबामहाराज परांजपे
साधना आश्रम,
दातार आळी, पेण.**

# शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांचे नुकसान

## ● रत्नागिरीत ढगांच्या गडगडाटासह पावसाची हजेरी





**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

**मोसमी पाऊस आपल्या हंगाम संपवून आता परतला असे वाटत असतानाच बुधवारी (दि.१५) दुपारी रत्नागिरी शहर आणि परिसरात पुन्हा एकदा आभाळ भरून आले. ढगांच्या गडगडाटासह पावसाला सुरुवात झाली. वेगवान वारे वाहू लागले आणि ढगांच्या गडगडाटासह अनेक ठिकाणी सरी कोसळायला सुरुवात झाली. यामुळे नेमका पाऊस कधी जाणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

दरम्यान, गेले दोन दिवस वातावरणातील उष्णता सुद्धा प्रचंड वाढली होती. या पार्श्वभूमीवर पावसाच्या सरी कोसळतील, अशी शक्यता व्यक्त केली जात होती, तर दोनच दिवसांपूर्वी हवामान खात्याकडून पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. या परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेच. परंतु, दिवाळी काही दिवसावर आल्याने रत्नागिरी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर विविध वस्तूंचे स्टॉल लावण्यात आले आहेत. मात्र अचानक वातावरणात बदल होऊन पाऊस सुरू झाल्याने त्याचा परिणाम बाजारपेठांवरही होण्याची शक्यता आहे.

पुन्हा एकदा पावसाच्या सरी कोसळत आहेत. अनेक ठिकाणी भात कापून शेतातच ठेवलेली असताना शेतकऱ्यांची गडबड उडली. त्यामुळे भातपिकांचे नुकसान होण्याच भितीने शेतकरा चिंतेत पडला आहे. तसेच, आता दिवाळीची लगबग सुरू झाली आहे. त्यामुळे बाजारपेठांमधली गर्दी वाढली आहे. खरेदी वाढली आहे. पावसाच्या सरी जर अशाच कोसळत राहिल्या तर त्याचा परिणाम बाजारपेठांवरही होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा पाऊस किती वेळ राहणार, याकडे आता शेतकऱ्यांसह नागरिकांचे लक्ष लागून राहिला आहे.

### माल वाचवण्यासाठी व्यापाऱ्यांची धावपळ

दिवाळी काही दिवसावर आल्याने रत्नागिरी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर विविध वस्तूंचे स्टॉल लावण्यात आले आहेत. मात्र अचानक वातावरणात बदल होऊन पाऊस सुरू झाल्याने बाजारपेठेतील व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. आकर्षक कंदील, रांगोळी, पणत्या आणि इतर वस्तू विकण्यासाठी व्यापाऱ्यांनी दुकाने सजवली असताना अचानक आलेल्या परतीच्या पावसाने व्यापाऱ्यांचे नुकसान केले आहे. अनेक दुकानांमधील कागदी कंदील भिजून गेले, तर काही ठिकाणी रांगोळीचे नुकसान झाले. पावसापासून मालाचा बचाव करण्यासाठी व्यापाऱ्यांची धावपळ सुरू होती.

## घाटकोपर येथे वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा

**| मुंबई | प्रतिनिधी |**

कै. वामनराव कोटावदे चौक (तात्या) हिंन्दूसभा हॉस्पिटलजवळ घाटकोपर वृत्तपत्र विक्रेता संघाच्या वतीने वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघ, कार्याध्यक्ष मा.मधुसुदन सदडेकर उपाध्यक्ष रवि संसारे, देव-देश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. डॉ.वैभव देवगिरकर, विवेव विचार मंच, मुंबई विचारमंच सयोजक मा. जयवंत तांब, घाटकोपर वृतपत्र विक्रेता सेना/ अध्यक्ष प्रकाश वाणी, कार्यकरते प्रकाश गिलबिले, युनूस पटेल, गणेश भोर व संघाचे कार्याध्यक्ष दिपक गवळी, कार्यकर्ते नितिन रेनूसे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच, घाटकोपरचे विक्रेते मोट्या संख्येने उपस्थित होते.

## भरदिवसा सोन्याच्या दुकानात दरोडा

**| मुंबई | प्रतिनिधी|**

घाटकोपरमधील गोळीबार रोड परिसरात बुधवारी (दि.१५) चोरीची घटना घडली. येथील दर्शन ज्वेलर्सचे मालक दर्शन मेटकरी यांनी सकाळच्या सुमारास नेहमीप्रमाणे दुकान उघडले. त्यानंतर काही वेळातच दुचाकीवरून आलेल्या तिघांनी त्यांच्या दुकानात प्रवेश केला. आरोपींनी चाकूचा धाक दाखवून दुकानातील सोन्याचे दागिने पळण्याचा प्रयत्न केला. दर्शन मेटकरी यांनी त्यांना विरोध केला. मात्र, आरोपीने दर्शन मेटकरी यांच्यावर हल्ला केल्यानंतर दुकानातील दागिने लुटून पोबारा केला. यामध्ये दर्शन मेटकरी गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच घाटकोपर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. दर्शन मेटकरी यांच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घाटकोपर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## राजू रिकामे यांना पुरस्कार

**| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |**

जन पहारा मराठी वृत्तपत्र व महाराष्ट्र सुपरफास्ट न्यूजचे सहसंपादक राजू महादेव रिकामे यांना जन आरोग्य जीवन सोसायटी तर्फे 'आदर्श पत्रकार पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नालासोपारा येथे झालेल्या जन पहारा मराठी वृत्तपत्राचा वर्धापन दिन समारंभाप्रसंगी हा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या मान्यवरांच्या हस्ते राजू रिकामे यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

या वेळी बोलताना प्रमुख पाहुण्यांनी सांगितले की, राजू रिकामे यांनी प्रामाणिकपणे आणि निर्भीडपणे पत्रकारिता करत समाजातील वास्तव मांडण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या कार्याचा उपयोग व मार्गदर्शन भावी पत्रकारांसाठी प्रेरणादायी ठरेल.

कार्यक्रमात सत्यनारायण पूजा व महाप्रसाद यांचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला स्थानिक मान्यवर, पत्रकार बंधू, समाजसेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पतसंस्थेतर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव, सत्कार

### ● श्री काळभैरव नागरी सहकारी पतसंस्थेचा अभिनव उपक्रम



**| मुरूड | प्रतिनिधी |**

श्री काळभैरव नागरिक सहकारी संस्था मुरुड यांच्यावतीने अभिनव उपक्रम राबविण्यात आला. मुरुड तालुक्यातील सर्व जाती धर्माच्या दहावी, बारावी व पदवीधर झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा विशेष गुणगौरव करण्यात आला. तसेच, विविध क्षेत्रातील ५ सत्कार मूर्ती यांनाही विशेष गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्या स्वरुपा धुमाळ साहाय्यक निबंधक मुरुड यांचा शाळ श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी दहावीचे २२ विद्यार्थी, बारावीचे १० विद्यार्थी, पदवीधर ७ विद्यार्थी, सभासद पाल्यांचे ११ विद्यार्थी तसेच, विविध क्षेत्रातील ५ जणांचे विषेश सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी शिक्षिका उषा खोत यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन या संस्थेच्या व्हाईस चेअरमन स्नेहा पाटील यांनी केले.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, संगणक भेट



**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

लायन्स क्लब खालापूर यांच्या माध्यमातून कोकण एज्युकेशन सोसायटी माध्यमिक शाळा माजगाव येथे शिक्षण घेत असलेल्या ५० विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. तसेच या शाळेत शिक्षण घेत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना ॲपल कंपनीचा संगणक त्याचसमवेत स्कूल बॅग, रजिस्टर व शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिक्षण घेत असताना शाळेय साहित्यांची समस्या जाणवू नये, यासाठी विद्यार्थ्यांना हे साहित्य देण्याचे काम गेली अनेक वर्ष या क्लबच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

यावेळी लायन क्लब अध्यक्ष किशोर पाटील, द्वितीय प्रांतपाल विजय गणांत्रा, डिस्ट्रिक्ट अध्यक्ष हँगर प्रोजेक्ट्अंकन शहा, डिस्ट्रिक्ट अध्यक्ष नागेश देशमाने, एक्स्टेंशन चेअर पर्सन ज्योती देशमाने, जितेंद्र सकपाळ, हरिभाऊ जाधव, भरत पाटील, दिपाली नरेश पाटील, अपर्णा शिंदे, राजेश पाटील, शशिकांत पाटील, प्रांजळ जाधव, वैशाली महाब्दि, वंदना महाब्दि, सरिता वाघे पूनम जाधव अदि सदस्या उपस्थित होते. तसेच ग्रामस्थ पोलीस पाटील रमेश ढवालकर, ढवाळकर, रणधीर पाटील, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांचे भाताचे पैसे रखडले

**| किन्हवली | प्रतिनिधी |**

शहापूर तालुक्यात मागील वर्षी भातखरेदी केल्यानंतर आदिवासी विकास महामंडळाकडून ७५० शेतकऱ्यांचे पैसे अद्याप खात्यात जमा करण्यात आले नाही. त्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेला शेतकरी निराश झाला आहे.

महामंडळाने व शासनाने तात्काळ याबाबत निर्णय घ्यावा अन्यथा शहापूर तालुक्यात शेतकऱ्यांचे बरं वाईट व्हायला वेळ लागणार नाही. दिवाळी आली तरी पैसे मिळत नसल्याने शेतकरी चिंतातूर झाला आहे. पिकवलेले भात महामंडळाला विकूनही पैसे मिळत नाही. त्यातच नवीन भात तयार झाले असून ते कधी विकले जाणार याची चिंता सुद्धा शेतकऱ्याला आहे. शहापूर तालुक्यात एकूण सहा खरेदी केंद्रे होती. यात ३६१० शेतकऱ्यांनी भात दिले होते. एकूण ८३ हजार क्विंटल भात खरेदी करण्यात आले होते. मात्र यातील ७५० शेतकऱ्यांचे भाताचे पैसे मिळाले नाहीत. पिकपेरा नसल्याचे कारण देत हे पैसे देण्यात आले नाहीत. भाताचे पैसे बाकी असणाऱ्या शेतकऱ्यांनी आदिवासी विकास महामंडळ, तहसीलदार, जिल्हाधिकारी यांना पत्रव्यवहार केला आहे. मात्र, अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.

## प्रेमी जोडप्याची विष प्राशन करून आत्महत्या

**| ठाणे | प्रतिनिधी |**

नालासोपाऱ्यातील प्रेमी जोडप्याने विष प्राशन करून आत्महत्या केली. बुधवारी सकाळी नालासोपारा पश्चिम येथील नाळे गावातील बेणापट्टी गावात ही घटना घडली. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

अनिलकेत जाधव (२०) हा तरूण अर्नाळा येथील सहजीवन पाडा परिसरात राहत होता. त्याचे नाळा बेणापट्टीमधील उज्वला डुबला (१७) नावाच्या तरुणीशी प्रेमसंबध होते. बुधवारी सकाळी ७ च्या सुमारास दोघे नाळे येथील उज्वलाच्या घरात मृतावस्थेत आढळले. त्यांच्या तोंडातून फेस येत होता. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र दोघांनाही मृत घोषित केले. त्यानी विष प्राशन करून आत्महत्या केली असावी, अशी शक्यता नालासोपारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विशाल वळवी यांनी व्यक्त केली आहे. त्यांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले.

## बेशिस्त पार्किंगवर दंडात्मक कारवाई



**| पनवेल | प्रतिनिधी |**

सीवूड्समधील वाहतूक पोलिसांनी नो-पार्किंग झोनमध्ये पार्क केलेल्या वाहनांवर कारवाई केली. नवी मुंबईतील सीवूड्समध्ये नो पार्किंग झोनमध्ये पार्क केल्याबद्दल सुमारे ७० वाहनांना दंड ठोठावण्यात आला. दंड आकारण्यापूर्वी वाहतूक पोलिसांनी मालकांना त्यांची वाहने काढून टाकण्याचे आवाहन करणारी घोषणा केली. त्यानंतरही, जेव्हा लोक त्यांची वाहने घेऊन निघून गेले नाहीत, तेव्हा त्यांच्यावर ऑनलाइन दंड आकारला.

याप्रसंगी बोलताना नेरुळ वाहतूक विभागाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहिनी लोखंडे म्हणाल्या की, लोक कुठेही निष्काळजीपणे त्यांची वाहने पार्क करतात. ज्यामुळे वाहतूक कोंडी होते आणि कधीकधी अशा पार्किंगमुळे रस्ते अपघात होतात. म्हणूनच, आम्ही सीवूड परिसरातील अनेक ठिकाणी 'नो पार्किंग'चे फलक लावले आहेत. ७० चारचाकी वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. भविष्यात ही समस्या सोडवली नाही तर आणखी कडक कारवाई केली जाईल. ज्यामध्ये वाहन जप्तीचा समावेश असू शकतो, असे यावेळी सांगण्यात आले.

**नेरुळ येथे पहिली सिग्नल शाळा सुरू | महापालिकेच्या शाळेत भरवले जातात वर्ग**

# रस्त्यावरच्या मुलांची शिक्षणाच्या दिशेने वाटचाल

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

शहरातील सिग्नलवर गजरे, फुले आणि अन्य वस्तू विकणाऱ्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी नेरुळमध्ये नवी मुंबई महापालिका आणि समर्थ भारत व्यासपीठ यांच्या पुढाकाराने पहिली सिग्नल शाळा सुरू करण्यात आली आहे. ठाण्याच्या धर्तीवर उभारण्यात आलेल्या या शाळेमुळे रस्त्यावरची मुले आता शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करू लागली आहेत.

विशेष म्हणजे, या शाळेत ४५ विद्यार्थी सध्या शिक्षण घेत असून या विद्यार्थ्यांचे वर्ग महापालिकेच्या शाळेत भरवले



जात असल्याची माहिती सिग्नल शाळेच्या व्यवस्थापकांनी दिली.

समर्थ भारत व्यासपीठ आणि ठाणे महापालिकेने काही वर्षांपूर्वी ठाणे शहरातील तीन हात नाका जवळ सिग्नल शाळा सुरू केली होती. तीन हात नाका आणि आजूबाजूच्या परिसरातील शाळाबाह्य मुलांना या शाळेचा फायदा झाला. अनेक विद्यार्थी या शाळेतून दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाले. आता, त्याच धर्तीवर समर्थ भारत व्यासपीठ यांनी नवी मुंबई महापालिकेच्या पुढाकाराने नेरुळ येथे सिग्नल शाळा सुरू केली आहे.

ठाणे शहरात तीन हात नाका सिग्नलजवळ पुलाखाली जशी शाळा सुरू केली. त्याचपद्धतीने नवी मुंबई शहातील महापे येथे सिग्नलजवळील पुलाखाली शाळा सुरू करण्याचा संस्थेचा प्रयत्न होता. परंतु, नवी मुंबई महापालिकेने पुलाखाली शाळा सुरू करण्याऐवजी पालिकेच्या एखाद्या शाळेतच शाळा सुरू करण्याची परवानगी दिली. त्यानुसार, नेरुळ सेक्टर ४ येथील शाळा क्रमांक १०२ मध्ये सिग्नल शाळा भरवली जाते.

जून २०२५ या शैक्षणिक वर्षापासून ही शाळा सुरू झाली आहे. सद्यस्थितीला या शाळेत ४५ विद्यार्थी शिक्षण घेत असून यात, २५ मुली आणि २० मुलांचा समावेश आहे.

महापे सिग्नल, घणसोली स्थानक, तेरणा महाविद्यालय परिसरातील या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यापूर्वी त्यांच्या पालकांचे समुपदेशन करावे लागले. शाळेची बस दररोज या मुलांची ने-आण करते. दररोज शाळेत ८० टक्के विद्यार्थी येत आहेत. हे विद्यार्थी सोय नसल्याने अंघोळी शिवायच शाळेत येत असतात. अशावेळी संगोपक ज्या विद्यार्थ्यांनी अंघोळ केलेली नाही, त्यांना अंघोळ घालून व्यवस्थित तयार करतात. मुलांना एकत्रित नाश्ता दिला जातो. मग शैक्षणिक वर्ग सुरू केले जातात.

> **या मुलांना शैक्षणिक अभ्यासक्रमासह समाजात मोकळेपणाने वावरता यावे, यासाठी या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर अधिक भर दिला जात आहे. या शाळेत आठवड्यातून एक दिवस मानसोपचार तज्ज्ञांना बोलावले जाते.**
>
> **– संतोष धुमक, नेरुळ सिग्नल शाळेचे प्रकल्प समन्वयक**

## निवडक

### विद्यार्थ्यांना प्रवासामध्ये ५० टक्के सवलत



**चिपळूण :** दिवाळी सुट्टीत गावच्या दिशेने जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्याच्या प्रवासामध्ये ५० टक्के सवलत देण्याचे एसटी महामंडळाने जाहीर केले आहे. याचा निश्चित फायदा वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना होणार आहे. चिपळूण आगार प्रशासनाकडून तालुक्यातील शाळा, महाविद्यालयात भेटी देत याबाबतची माहिती देत विद्यार्थ्यांकडून अर्ज देखील भरुन घेतले जात आहेत. दिवाळी सणासाठीचे नियोजन आतापासून घराघरात सुरु झाले आहे. शैक्षणिकदृष्ट्या विचार करता सध्या शाळा, महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु असून त्या काही दिवसाने संपणार आहेत. त्यानंतर खऱ्या अर्थाने दिवाळी सुट्टी सुरु होणार आहे. सुट्टी कालावधी मोठा असल्याने साहजिकच विद्यार्थी आपपल्या गावच्यादिशेने जात असतात. विशेष म्हणजे महिलांसाठी यापूर्वीच एसटी प्रवास ५० टक्के सवलत दरात सुरु आहे. यामुळे दिवाळीसुट्टीत गावच्यादिशेने जाणाऱ्या विद्यार्थ्यामध्ये हा ५०टक्के सवलतीचा फायदा केवळ मुलांनाच होणार आहे.

### डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती



**अलिबाग :** स्वयंसिद्धा संस्था संचलित स्पर्धा विश्व अकॅडमीमध्ये डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्म दिवस जागतिक विद्यार्थी दिन आणि वाचन प्रेरणा दिन म्हणून देखील साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्याचा उद्देश विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे आणि डॉ. कलाम यांचे भारताचे स्वप्न साकार करणे आहे. त्यांची साधेपणा, वैज्ञानिक विचारसरणी आणि प्रेरणादायी विचार लाखो तरुणांना मार्गदर्शन करत आहे. त्यांच्या मते आजची युवापिढी ही राष्ट्राची सर्वात मोठी ताकद आहे आणि विद्यार्थी हे राष्ट्राचे भविष्य आहे. आपल्या राष्ट्रपती पदाच्या कालावधीमध्ये देखील ते विद्यार्थ्यांना भेटण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांना भेट देत असत. तसेच, १५ ऑक्टोबर रोजी होणारा जागतिक विद्यार्थी दिन हा केवळ एक जयंती कार्यक्रम नसून डॉ. अब्दुल कलाम यांचे आदर्श स्वीकारण्याची आणि समाजात शिक्षणाला उच्च पातळीवर नेण्याची संधी आहे हे लक्षात घेतले पाहिजे, असे यावेळी सुचिता साळवी यांनी प्रतिपादन केले. या कार्यक्रमाला स्पर्धा विश्व अकॅडमीचे बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम उत्साहात



**अलिबाग :** स्वामी समर्थ सार्वजनिक ग्रंथालय चेंढरे येथे डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावर्षी यानिमित्ताने सुप्रसिद्ध वक्त्या श्रुती देसाई राजे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. कुसुमाग्रजांच्या कविता याविषयी त्यांनी त्यांच्या अमोभघ वाणीत व्याख्यान दिले. पृथ्वीचे प्रेमगीत या कवितेचे सुंदर विवेचन केले. तसेच अभिजात मराठी सप्ताहाचे औचित्य साधून मराठी भाषेच्या व्याकरणातील विविध वृत्तांचे जसे मंदार माला शार्दुल्लविक्रिडीत व इतर वृत्तांचे कवितेतील महत्त्व व कवितेच्या चाली यांचे सविस्तर विवेचन केले. याप्रसंगी ग्रंथालयाच्या सचिव नीता काणेकर, संचालिका रश्मी सुंकले, डॉ. मानसी लोंढे, ज्योती आमले, यावलकर व बहुसंख्य महिला वाचक उपस्थित होते.

### संगणक परिचालकांचे मानधन थकीत



**रत्नागिरी :** जिल्ह्यातील सुमारे ६६६ संगणक परिचालक गेले चार महिने मानधनापासून वंचित आहेत. गणपती सणानंतर दिवाळीही कडूच होणार, हे निश्चित आहे. संगणक परिचालकांचे जूनपासून म्हणजेच चार महिने मानधन थकीत आहे. गेली सुमारे पंधरा वर्षे संगणक परिचलक महिना दहा हजारएवढ्या तुटपुंज्या मानधनावर काम करत आहेत. मानधनवाढ व्हावी, यासाठी त्यांनी वेळोवेळी आंदोलनेही केली आहेत. एप्रिल महिन्याचे मानधन अदा केले. त्यानंतर संगणक परिचालकांना मानधन देण्यात आलेले नाही. ऑगस्ट महिन्यात गणपती उत्सवात केवळ मे महिन्याचे मानधन खात्यावर जमा करून परिचालकांची बोळवण करण्यात आली होती. त्यानंतर एकाही महिन्याचे मानधन परिचालकांना दिलेले नाही. गेले चार महिने मानधन होण्याच्या प्रतीक्षेत आहेत. दिवाळीला तरी थकीत सर्व महिन्यांचे मानधन मिळेल का, असा प्रश्न परिचालक विचारात आहेत.



### आकाशकंदील, पणत्यांचा झगमगाट

**उरण :** दिवाळी सणाला थोडेच दिवस राहिले आहेत. त्यामुळे उरण बाजारपेठेत पणत्या, कंदील, दिवे, रांगोळी, सजावटीचे साहित्य, मिठाई आणि इतर आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. उरण बाजार पेठेतील आनंद नगर, मुख्य बाजारपेठेत विविध आकाराच्या, रंगीबेरंगी पणत्या, आकाशकंदील, रांगोळीचे ठसे बाजारात विक्रीसाठी दाखल झाले आहेत. दिवाळीचा सण आनंदात साजरा करण्यासाठी, नागरिकांची जय्यत तयारी सुरू झाली आहे. सजावटीच्या वस्तू, पणत्या, आकाशकंदील, तोरणे आणि इतर घरगुती सजावटीच्या वस्तूंनी बाजारपेठांमध्ये गर्दी केली आहे. लहान आकाराच्या पणत्या - ४० ते ७० रुपये डझन, मोठ्या रंगीत पणत्या ८० ते १२० रुपये ४ नग, मोठे दिवे - ८० ते १५० रु., लहान कंदील- १०० रु., मध्यम आकाराचे कंदील - २५० ते ३५० रु., मोठे कंदील - ५०० ते ३०००रु. आदी दराने विकले जात आहेत.

## निवडक



### वाचन प्रेरणा दिन साजरा

**सुतारवाडी** : रायगड जिल्हा परिषद शाळा, कुडली येथे दि. १५ ऑक्टोबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती आणि महान वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांवर आधारित भाषणे, कविता आणि वाचन सादरीकरणे केली. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना रोज वाचनाची सवय लावण्याचे महत्त्व सांगितले. यावेळी सहावी व सातवीचे विद्यार्थी उपस्थित होते. या सर्वांना मोहन राठोड यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, वाचन ही यशाची पहिली पायरी आहे, आणि डॉ. कलाम यांचे जीवन हे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी दररोज किमान ३० मिनिटे वाचन करू अशी शपथ घेत वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.



### मॉलने साकारला सिंधुदुर्ग किल्ला

**पनवेल** : शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात किल्ल्यांचे महत्त्व खूप जास्त होते.ते फक्त संरक्षणासाठी नव्हते तर स्वराज्याच्या राजनैतिक, लष्करी आणि आर्थिक धोरणांचा आधार होते. किल्ले ही स्वराज्याची प्रबळ सुरक्षा व्यवस्था होती, ज्यातून शत्रूंपासून स्वराज्याचे संरक्षण करणे, लष्करी कारवाया करणे आणि सैन्यासाठी आश्रयस्थान मिळवणे शक्य झाले. राजगड, रायगड यांसारख्या किल्ले राजधानी आणि प्रशासनाचे केंद्र बनले, तर सिंधुदुर्गसारखे जलदुर्ग समुद्रावरून होणाऱ्या आक्रमणांपासून स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी महत्त्वाचे होते. याच सिंधूदुर्ग किल्ल्याची भव्य प्रतिकृती ओरायन मॉलमध्ये उभारण्यात आली आहे. दिवाळीत किल्ले बनविण्याची परंपरा आजही बच्चे कंपनी जोपासत आहे. याच धर्तीवर मॉलने हि संस्कृती जपत भव्य सिंधुदुर्ग किल्ला मॉलमध्ये उभारला आहे. दिवाळी निमित्त मॉलमध्ये येणाऱ्या नागरिकांमध्ये आपल्या संस्कृतीचा जागर व्हावा यादृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती मंगेश परुळेकर यांनी दिली.

### नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांना अनुदान जाहीर

**आगरदांडा** : मुरुड जंजिरा नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी नगर परिषद कर्मचारी वर्गासाठी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मोठी आनंदवार्ता दिली आहे. नगर परिषदेतील सर्व आस्थापनेवरील कर्मचारी यांना वीस हजार रुपये इतके सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली आहे. ही घोषणा होताच नगर परिषदेतील कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. महागाईच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांना आर्थिक दिलासा मिळावा, तसेच त्यांचा मनोबल वाढावा या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासकांनी सांगितले.नगर परिषदेच्या या निर्णयाचे मुरुड जंजिरा नगर परिषद कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश आरेकर यांनी स्वागत केले असून प्रशासक तथा मुख्याधिकारी यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहे.

### शैला तुरेंना राज्यस्तरीय पुरस्कार

**पाली/गोमाशी** : खारपाले पेण येथील शैला प्रमोद तुरे यांनी प्रतिकूल परिस्थितीतून आपण आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. आपण आपल्या ज्ञानाचा अनुभवाचा व विचारसपन्नतेचा



उपयोग समाजातील गरजू शोषित पीडित लोकांना पुन्हा नव्याने उभं राहण्यासाठी केला. ज्यामुळे समाजातील दुर्लक्षित घटक हा आनंद व विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदत झाली आहे. आपल्या क्षेत्रातील योगदान समाज बळकटीकरणास सहाय्यक आहे. आपले समाज कारण निश्चितच इतरांसाठी अनुकरणीय तसेच नव्या पिढीस आदर्श व आमच्याकरता भूषणावह आहे याचा विचार करून राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला आहे. हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विविध स्तरातून अभिनंदन, कौतुकाचा वर्षाव होत आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अकाऊटंट पाहिजे.** पात्रता- Bcom, Tally अनुभव- ५ वर्षे ठिकाण- बामणसुरे, चोंढी, पगार २५००० महिना, Contact- 9823585321
- **अलिबागमध्ये ऑफिस कामासाठी** १० वी पास मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- **मुलं, मुली पाहिजेत कामासाठी १० वी १२ वी पास** औषधांच्या एजन्सीमध्ये part time सुद्धा चालेल. वेळ : १०.०० am to ७.०० pm
- **अलिबागमध्ये समर्थ मठ, पिंपळभाट,** गोंधळपाडा, रेवस बायपास परिसरामध्ये २ BHK प्रशस्त रूम असलेला, २ टॉयलेट असलेला, पार्किंग असलेला, रेडीपोझिशन फ्लॅट त्वरीत विकत घेणे आहे. फ्लॅट दहा वर्षापेक्षा जास्त जूना नको. फ्लॅट ग्राऊंड फ्लोअर किंवा टॉप फ्लोअर नको एजंटचे स्वागत आहे. मो. ७७५८९७५४०७
- **सहारा ट्रॅव्हल्स** अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ संपर्क :९२७०५६०४५६
- **अलिबागमध्ये कळंबादेवी** मंदिर शेजारी नवीन बिल्डिंग पहिल्या मजल्या वरचे सलग दोन गाळे विकणे /भाड्याने देणे आहे. संपर्क ९१४६६८५१००
- **अलिबाग रेवस रोड** (RCF) कंपनीजवळ भाड्याने दोन सेमी फर्निश रुम देणे आहेत. गेस्ट हाऊस अथवा लॉजिंग साठीही चालू शकेल. संपर्क : ७५०७३०१३५१/९२७०४९८०९९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# ग्रामीण शेतकऱ्यांची केविलवाणी धडपड

## आडवी झालेली भातपिके वाचविण्यासाठी प्रयत्न; खरिपाच्या पिकावर कुटुंबाचा उदरनिर्वाह

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यात ऑक्टोबर महिन्यात परतीचा पाऊस कोसळला. त्यामुळे कापणीला आले उभे पीक शेतात जमीनदोस्त झाले आहे. दिवाळीचा सण तोंडावर आला असताना, शेतकरी मात्र उरले सुरलेले पीक गोळा करण्यासाठी धडपड चालु आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा दिवाळीचा सण संकटातच जाणार आहे.

सरकारी यंत्रणेने शेतीच्या नुकसानीचे पंचनामे केले आहेत. मात्र या परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या घरात खरिपाचे धान्य आलेले नाही. त्यामुळे बऱ्याचशा शेतकऱ्यांना यावेळी धनत्रयोदशीला नवीन दाण्याची



पूजा करता येणार नाही. याची शेतकऱ्यांना खंत वाटते.

त्याचबरोबर या महिन्यात अजून पाऊस कोसळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे हातातोंडासी आलेले भरघोस भाताचे पीक वाया जाणार असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. या भागात काही प्रमाणात पाळीव गुरुढोरेही आहेत. त्यांच्या खाद्याचा विचार करता पेंढा हा महत्त्वाचा आहे. परंतु परतीच्या पावसाच्या भीतीमुळे कापणीनंतर भाताची कडवी दोन-तीन दिवस शेतात वाळत न ठेवता, भाताची ताबडतोब झोडणी केली जात आहे. त्यामुळे गुरांच्या चाऱ्याचाही प्रश्न बिकट बनला आहे.

उरण तालुक्यात वर्षभरात खरिपाचे एकमेव पीक घेतले जाते. या पिकाच्या उत्पन्नावर येथील शेतकऱ्यांना वर्षभर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. सद्यस्थितीत नैसर्गिक आपत्ती, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, अतिवृष्टीने शेतकरी अक्षरश: उध्वस्त झाला आहे.

परतीच्या पावसात शेतकऱ्यांचे सोन्यासारखे भातपीक मातीमोल झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी हवालदिल झाला असून, परतीच्या पावसाने शेतकऱ्यांना रडविले आहे. त्यामुळे भात पिकांचे सरसकट पंचनामे करून, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

उरण तालुक्यातील मोठीजुई, कळंबुसरे, चिरनेर, वशेणी, विंधणे, दिघोडे, वेश्वी, खोपटे, सारडे, धाकटीजुई, केगाव, नागाव या भागातील अनेक गावातील भातखाचरात पाणीच पाणी झाले असून, भाताची पिके आडवी होऊन पूर्णपणे पाण्यात बुडाली आहेत.

खाडी विभागातील शेती अक्षरशा पाण्याखाली आली आहे. भात शेतीत गुडघाभर चिखल असून, अशा चिखलात जाऊन शेतकरी भातपिके वाचविण्याचे प्रयत्न करत आहेत. त्याचबरोबर या भागात कापणीला आलेली भातपिके चिखलात सापडली आहेत. त्याला कोंब देखील आले आहेत. त्यामुळे भातपिके कुजून जाण्याची शक्यता असल्याची माहिती, येथील शेतकरी गोपाळ केणी यांनी दिली. दरम्यान शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# कर्जतमध्ये रुग्णवाहिका येण्यास विलंब

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात चार ठिकाणी शासनाची १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका आहे. १०८ या क्रमांकावर कॉल केल्यानंतर १५ मिनिटात रुग्णवाहिका पोहचली पाहिजे असे शासनाने संबंधित रुग्णवाहिका पुरविणाऱ्या ठेकेदार कंपनीला निर्देश असताना कर्जतमध्ये चक्क सहा तासांनी रुग्णवाहिका पोहचली आहे. दरम्यान, रुग्ण अत्यवस्थ असताना असा हलगर्जीपणा आरोग्य विभागाकडून केला जात असल्याने आरोग्य विभागाच्या कारभाराबद्दल नाराजी व्यक्त केली जात आहे.



तालुक्यातील सालपे आदिवासी वाडीमधील अनंता लक्ष्मण वाघमारे (३५) आणि सांगवी आदिवासीवाडी येथील गोरखनाथ काळुराम पवार (२५) या दोघांच्या गाडीचा अपघात झाला. त्यावेळी सायंकाळ होत आल्याने स्थानिकांनी मदतीसाठी धाव घेतली. प्राथमिक उपचार घेतल्यावर पुढील उपचारासाठी नेण्याकरिता रुग्णासाठी आवश्यक असलेली रुग्णवाहिका अनेक ठिकाणी संपर्क करून देखील रुग्णवाहिका उपलब्ध व्हायला सहा तास लागले. अपघातानंतर १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध झाली नाही. त्यामुळे अपघातात जखमी झालेल्या रुग्णांना रुग्णवाहिकेची वाट पाहत बसावे लागले. कर्जत कोंडीवडे मार्गावर शिरसे ते आकुर्ले भागात दोन दुचाकीच्या धडकेत

### सहा तास रुग्ण अत्यवस्थ


हे दोघे गंभीर जखमी झाले होते. स्थानिकांनी त्या दोन्ही जखमी यांना तातडीने कर्जत येथील उपजिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल केले. उपजिल्हा रुग्णालयात डॉ. सी के मोरे यांनी प्रथमोपचार करून जखमी तरुणांच्या अंगावरील जखमा या गंभीर स्वरूपातील असल्याने तातडीने उल्हासनगर येथील रुग्णालयात जाण्यास सांगितले.त्यानंतर १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेला फोन करण्यात आला. मात्र, गाडी खराब आहे, टायर पंक्चर झाला आहे, गाडी खोपोलीत किंवा नेरळमध्ये आहे, अशी कारणे दिली जात होती.

# 'शेतकऱ्यांची ई-पीक करा'

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी आपल्या शेतावर जाऊन ई-पीक करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यामधून ५० टक्के शेतकऱ्यांचे ई-पीक झालेली आहे व इतर शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन सुद्धा ई-पीक झालेली नाही. ती करण्यात यावी यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी आणि कार्यालयीन चिटणीस विलास फडके यांनी पनवेलच्या अप्पर तहसीलदार राजश्री जोगी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.

यावेळी तालुक्यातील शंभर टक्के शेतकऱ्यांना ई-पीक दाखला देऊन शासनाच्या



विविध प्रकारच्या योजने चा लाभ मिळेल याकडे लक्ष द्यावे अशी विनंती केली.

याबाबत आपली प्रतिक्रिया देताना पनवेल तालुका अप्पर तहसीलदार राजश्री जोगी यांनी सांगितले आम्ही पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांचा शंभर टक्के युपी दाखला देण्याचा प्रयत्न करू असे सांगितले.

# केंम्ब्रिजतर्फे दिवाळी कलेक्शनवर आकर्षक ऑफर्स

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

केंम्ब्रिज महाराष्ट्रातील फॅशन ब्रँड या दिवाळीला खऱ्या अर्थाने मूड बनविणार आहे. दिवाळीसाठी केंम्ब्रिजने शर्ट व ट्राऊजर्सची दोन नवीन कलेक्शन्स सादर केलेली आहेत. यामधील बांबू कलेक्शन म्हणजे बांबूच्या तंतूपासून बनविलेले शर्ट्स तुमचा रूबाब वाढविणारे आहेत. या शर्ट्सची किंमतही कमी असून केवळ रू. ९९९ पासून पुढे या किंमतीमध्ये आपल्या सर्वांना हे नावीन्यपूर्ण शर्ट्स खरेदी करता येणार आहेत. फोर वे स्ट्रेच ट्राऊजर्सची किंमत रू. १३९९ पासून पुढे आहे. तसेच आजच्या फॅशन युगाला साजेशा ट्राऊजर्स, जीन्स तसेच शर्ट्स, डेनिम शर्ट्स, टी-शर्ट्स, ब्लेझर्स, एथनिकची देखील भव्य श्रेणी इथे पाहायला मिळणार आहे. या खरेदी सोबतच तुम्हांला खास ऑफर्सही देण्यात येत आहेत. यामध्ये रू.४९९९ च्या खरेदीवर रू. ४९९ च्या क्सेसरीज मोफत तर रू. ७९९९ च्या खरेदीवर रू. ९५० किंमतीचा मिल्टन लंच बॉक्स मोफत देण्यात येत आहे. तेव्हा आजच आपल्या जवळील शोरूम्सना भेट द्या आणि दिवाळी निमित्त केंम्ब्रिज शोरूममध्ये सुरु असलेल्या आकर्षक ऑफर्सचा लाभ घ्या असे आवाहन केंम्ब्रिजद्वारे करण्यात आले आहे.

# कर्जतमध्ये राष्ट्रीय पोषण महिना साजरा

**। नेरळ। प्रतिनिधी ।**

कर्जत येथील आदिवासी आणि ग्रामीण भागात कार्य करणाऱ्या लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट, फिरता दवाखाना युनिट आणि चिल्ड्रन्स होप इंडिया यांच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील दुर्गम भागांतील नागरिकांसाठी आरोग्यसेवा तसेच, विविध आरोग्य विषयक विषयांवर मार्गदर्शन शिबिरे आयोजित करत आहे. याच उपक्रमांतर्गत राष्ट्रीय पोषण महिना म्हणून साजरा करण्यात येतो आणि यावर्षीही युनिटने अनेक शाळांमध्ये मुलांसाठी आणि पालकांसाठी पोषण विषयक जनजागृती उपक्रम राबवले.



रायगड जिल्हा परिषदेच्या विविध शाळांमध्ये तसेच लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या कर्जत येथील सेंटरमध्ये महिला विद्यार्थ्यांसाठी पोषण विषयक मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये प्रामुख्याने पौष्टिक आहार या विषयावर पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनमध्ये पौष्टिक घटकांची ओळख, कर्बोदके, जीवनसत्त्व, खनिजे, प्रोटीनचे महत्त्व आणि अन्न पचनासाठी व चांगल्या आरोग्यासाठी पाणी किती महत्त्वाचे आहे अशा सहा घटकांची माहिती देण्यात आली. त्याच बरोबर पौष्टिक आहारावर आधारित व्हिडिओ चे सुद्धा सादरीकरण करून मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये सहभाग वाढावा यासाठी बालक-पालक पौष्टिक भेळ स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला मल्टिव्हिटॅमिन सिरप पारितोषिक म्हणून देण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ. नेहा सोनावळे तसेच केशव कवठे, सारिका वेहले, सुरज भिंडेरे, यांनी शाळा शाळांमध्ये जाऊन पोषण माह बद्दल जनजागृती करण्याचे कार्य केले आहे.

# आगरी समाज संस्थेची सभा उत्साहात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आगरी समाज संस्था, अलिबागतर्फे आयोजित अलिबागमधील आगरी बांधवांची पहिली मासिक सभा शनिवारी सायंकाळी श्री विठ्ठल-रुख्मिणी मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

या सभेला अलिबाग शहरासह परिसरातील अनेक आगरी बांधवांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



समाजातील कार्यकर्त्यांनी आगरी संस्कृतीचे संवर्धन, तरुण पिढीचा सहभाग, शिक्षण, रोजगार, विवाह आणि सामाजिक ऐक्य यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर विचारमंथन केले. आगरी समाजाला संघटित करून विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठोस प्रयत्नांची गरज असल्याचे मत सर्वांनी व्यक्त केले.

या सभेच्या यशस्वी आयोजनासाठी ॲड. सचिन पाटील, प्रभाकर ठाकूर, राजेंद्र पाटील, दर्शना पाटील, मनोहर पाटील आणि श्रेयस ठाकूर यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या प्रयत्नांमुळे कार्यक्रम उत्तम पद्धतीने पार पडला.

## कामोठे येथे वृक्षारोपण कार्यक्रम

**पनवेल** : कामोठे वसाहतीतील निसर्गप्रेमी संघटनेकडून वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास सुनिल करपे, विमल बिडवे, पगारे, जय पावणेकर, राजाराम पाटील, शुभांगी खरात, सुरेश खरात, पंकज पाटील, रवी गोवारी आदी उपस्थित होते. यावेळी विविध प्रजातीच्या आंबा, जांभूळ, कडुलिंब, सुपारी, बहावा, तुती, बोगनविलिया, पारिजात, बेगम बहार आदी वृक्षारोपण करण्यात आला.

# ज्येष्ठ नागरिक संस्थेची सभा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग ज्येष्ठ नागरिक संस्थेची सभा ज्येष्ठ नागरिक दिनाचे अवचित्य साधून रविवार (दि. १२) ऑक्टोबर रोजी अलिबाग येथील जनरल अरुण कुमार वैद्य विद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाली. सभेत संस्थेच्या कार्याचा संस्थेचे अध्यक्ष प्रफुल्ल राऊत यांनी आपल्या प्रास्तविकास आढावा घेतला. यावेळी सभासदांच्या नातवांनी परीक्षेत विशेष यश संपादन केलेल्या नातवंडांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सभासदांच्या लग्नाला पन्नास वर्षे पूर्ण झाली आहे अशा ग्रामपंचायतीचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे ज्या सभासदांच्या वयाला ९० वर्षे ८० वर्षे व ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत अशा सभासदांचा सत्कार करण्यात आला. सदर वेळी धोकवडे येथील नरहरी तोडणकर निवृत्त शिक्षकाचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. नंदू तळकर यांनी सभेच्या कामकाजाचे नियोजन केले होते. शरद कोरडे व के डी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

### विविध रंगाच्या रांगोळ्यांची विक्री | खरेदीसाठी ग्राहकांची मोठ्या प्रमाणात गर्दी

# श्रीवर्धनमधील बाजारपेठा दिवाळीसाठी सजल्या

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

**दिवाळी सण काही दिवसांवर आला असून श्रीवर्धन बाजारपेठ विविध वस्तूंच्या खरेदीसाठी सजली आहे. बाजारपेठेत विविध रंगाचे, विविध आकारांचे आकाश कंदील विक्रीला आले आहेत. विक्रेत्यांनी रंगीबेरंगी पणत्या, रांगोळी,आकाश कंदील,घरगुती सजावटीचे साहित्य विक्रीसाठी ठेवले आहेत. या सणाला दिव्यांचे विशेष महत्त्व असल्याने बाजारात लाल मातीच्या व डेकोरेटिव्ह पणत्या विक्रीसाठी उपलब्ध आहेत. खरेदीसाठी ग्राहकांची काही प्रमाणात गर्दी होत असून, वेगवेगळ्या आकाराचे,रंगांचे आकाश कंदील, फटाके खरेदीकडे ग्राहकांचा कल दिसून येत आहे.**

विद्युत रोषणाईच्या माळां बरोबर पणत्या, समई विक्री करीता उपलब्ध आहेत. विविध रंगाच्या रांगोळ्यांची विक्री यावेळी वाढली आहे. रांगोळीचे रंग, पोस्टर रांगोळीचे रंग, रांगोळी बाजारात विक्रीसाठी आहेत. दिवाळीत पणत्यांना विशेष महत्त्व असते. यंदा बाजारात पणत्यांचे विविध प्रकार आले असून, त्यात मेणापासून तयार केलेल्या व पाण्यावर तरंगणाऱ्या गुलाब, जास्वंद फुलांच्या आकारातील पणत्या आणि फॅन्सी व लाल मातीच्या पणत्यांची बाजारात चलती आहे. विजेवर





चालणाऱ्या पणत्याही सर्वसामान्यांचे लक्ष वेधून घेत आहेत.

दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटक्यांची आतषबाजी केली जाते. फटाक्यांच्या किंमतीही काही प्रमाणात वाढल्या असल्या तरी ग्राहकांकडून टिकली केपां पासून रंगीत व आकर्षक फटाक्यांची मागणी होत आहे, असे फटका विक्रेते सावन तवसाळकर यांनी सांगितले आहे.

आकाशकंदील, पणत्यांसह किल्ल्यांवर ठेवण्यासाठी शिवाजी महाराज, मावळे, तोफा यांच्या प्रतिकृती तसेच विविध सजावटीच्या वस्तूंची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे.

नागरिकांनी चायना मेड वस्तूंकडे पाठ फिरवली असून भारतीय बनावटीच्या वस्तूंना ग्राहक प्राधान्य देत असल्याचे व्यवसायिक रूपेश तिताडे यांनी दिली. दिवाळी फराळाची आगाऊ नोंदणी हॉटेल, महिला गृह उद्योग, महिला बचत गट मार्फत सामाजिक माध्यमातून होत आहे. अनेक महिलांनी आयते फराळ न मागवता घरीच फराळ करण्यास सुरूवात केली आहे.

### चिरांट नामशेष होण्याच्या मार्गावर

नरकचतुर्दशीच्या दिवसाला अभ्यंगस्नाना अगोदर डाव्या पायाच्या अंगठ्याने चिरांट नावाचे कडू फळ फोडण्याची परंपरा महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आहे. या कडू फळाच्या रूपात नरकासुराचा प्रतीकात्मक वध करीत कटुता, दुष्टता नाहीशी व्हावी, अशी प्रार्थना केली जाते. जंगल परिसरात वेलींवर उगवणारे चिरांट सद्यस्थितीत जंगले उध्वस्त होत असल्याने नामशेष होत आहे.

# विद्यार्थ्यांना मोफत हेल्मेट वाटप



**। उरण । प्रतिनिधी ।**

सेवा सहयोग फाऊंडेशन ही संस्था गेल्या १६ वर्षांपासून शिक्षण, पर्यावरण व महिला सक्षमीकरण अशा विविध सामाजिक विषयांवर कार्यरत आहे. संस्थेचे सामाजिक उपक्रम हे बहुआयामी असून समाजात जागरूकता निर्माण करण्यास हातभार लावतात. अशाच उपक्रमांपैकी एक म्हणजे 'राईड टू सेफ्टी' रस्ता सुरक्षा जागरूकतेसाठी राबविण्यात येणारा प्रभावी उपक्रम आहे. या उपक्रमांतर्गत ज्या पालकांकडून आपल्या मुलांना दुचाकीवरून शाळेत आणले जाते, अशा पालकांना आणि विद्यार्थ्यांना मोफत हेल्मेट वितरित केले जाते. हा उपक्रम आयसीआयसीआय लोम्बर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने राबविला गेला. या उपक्रमांतर्गत फुंडे येथील तु.ह. वाजेकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना व पालकांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुजावर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, श्री.सखाराम कोंडीबा कदम व एक रा.मु.मायणी, पो.रानसई, ता.पेण,जि.रायगड हे येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी मी स्वत: आशुतोष किशनलाल बीयानी रा.६०६ जीवन विहार,५, मानव मंदिर रोड, मलाबार हिल, मुंबई महाराष्ट्र ४००००६ विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| शेडाशी कातकरी वाडी | श्री.सखाराम कोंडीबा कदम व एक | १८ | २५ | ०.३०.०० | ०.३९ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहोत. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. १६/१०/२०२५

**आशुतोष किशनलाल बीयानी**
रा.६०६ जीवन विहार,५, मानव मंदिर रोड
मलाबार हिल मुंबई-महाराष्ट्र ४००००६
मो.९००४६०००४६

## जाहीर नोटीस

नि : ४९/ड

निशाणी नं. ..... वादीचे वकिल ॲड.महेश एस. म्हात्रे
प्रोसेस जमा विशेष दिवाणी दावा नं. ३१/२०२२

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात**

श्री. भरत अमृतलाल तन्ना, ...वादी
विरूद्ध
श्री. हेमंत मधुकर हजारे, वगैरे ... प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी नं.१ श्री. हेमंत मधुकर हजारे
रा.मिरची गल्ली, विठोबा मंदिरा समोर,
बाजारपेठ अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड.

यांसी,

या जाहीर नोटीसने तुम्हांस कळविण्यात येते की,

वादी श्री.भरत अमृतलाल तन्ना यांनी अलिबाग येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर. यांच्या न्यायालयात तुमचे विरूद्ध मौजे. कुरूळ येथिल गट नं. ५०/८ व ५०/१० या मिळकतींचा दि.०२/०७/२०१६ रोजी केलेल्या साठेकराराची पुर्तता करून मिळणेकरीता सदरचा दावा दाखल केला आहे. दाव्याचे समन्सची बजावणी होवुन देखिल तुम्ही हजर न राहिल्याने तूमचे विरूद्ध एकतर्फा आदेश झाला आहे. त्यानंतर सदर मिळकती विक्रीस काढल्यामुळे वादीने मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे. त्याची कोर्टामार्फत व पोस्टामार्फत बजावणी केली असता तूम्ही समन्स स्विकारले नाहीत.

तरी तुम्हांस कळविण्यात येते की, तुम्ही मा. न्यायालयात दि: १८/११/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीला मार्फत हजर होवुन म्हणणे व कागदपत्रे दाखल करावीत. जर वरील तारखेस व वेळेत मा. न्यायालयात कुणीही हजर झाले नाहीत तर मा. कोर्ट वादीचा मनाई हुकूमाचा अर्ज मंजुर करून करतील याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस माझ्या सहीनीशी व मा.कोर्टाच्या शिक्यानिशी आज रोजी दिली.

अलिबाग
ता. १४/१०/२०२५
क. लिपिक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अलिबाग रायगड

कोर्टाचा शिक्का

सहा. अधिक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अलिबाग रायगड.

## उरण नगरपरिषद, उरण

**जिल्हा - रायगड**

**प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)**

शहर स्तरीय तांत्रिक कक्ष (CLTC) स्थापत्य अभियंता पदासाठी भरती

मा.मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद, उरण जिल्हा-रायगड यांचेकडून ''प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) शहर स्तरीय तांत्रिक कक्ष (CLTC) स्थापत्य अभियंता'' या पूर्णपणे कंत्राटीपद्धतीने (पदसंख्या-१, मासिक वेतन (केंद्र शासनाच्या निर्गमित होणाऱ्या आदेशानुसार) भरती करणेकामी पात्र इच्छुक उमेदवारांनी उरण नगरपरिषद कार्यालयात आपला अर्ज व आवश्यक कागदपत्र दिनांक २४-१०-२०२५ रोजीपर्यंत दाखल करावित. याबाबतची सविस्तर माहिती उरण नगरपरिषद कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

**पदासाठी आवश्यक अनुभव :-**

१)मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवी/पदव्युत्तर (स्थापत्य अभियांत्रिकी) अभ्यासक्रम पूर्ण केलेला असणे बंधनकारक आहे.
२) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) क्षेत्रात अनुभव असल्यास प्राधान्य
३) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक

सही/-
**(समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**

## म्हसळ्यात वाचन प्रेरणा दिन साजरा

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त १५ ऑक्टोबर हा दिवस 'वाचन प्रेरणा दिन' साजरा केला जातो. यानिमित्ताने केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालयाच्यावतीने पीएमश्री शाळा म्हसळा येथे वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार संजय खांबेटे, जेष्ठ साहित्यिक विलास यादव, संचालक रेखा धारिया, प्रा. शिरीष समेळ, केंद्रप्रमुख धर्मा धामणकर, शाळा समिती अध्यक्ष शशिकांत शिर्के तसेच ग्रंथपाल उदय करडे, सायली चोगले, प्राची मेंदाडकर यांची उपस्थिती लाभली. यावेळी मान्यवरांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वातून वाचनाचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित केले.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल यांचे कार्यालय

**कार्यालयीन पत्ता - कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, ए विंग, पहिला मजला, सहकार नगर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.,**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये जाहीर नोटीस**

**कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग, शाखा कामोठे.**

**प्रतीक गार्डन, गाळा नं, ३४ सेक्टर ३४, कामोठे, पनवेल ४१०२०९**

**विरुद्ध**

खालील दर्शविलेल्या जाब देणार यांना नोटीस देण्यात येते की, थकीत कर्जाविषयी अर्जदार संस्थेने दाखल केलेल्या वसुली अर्जाबाबत आपले म्हणणे सादर करणेसाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती, खालील नमूद थकबाकीदार यांना थकीत कर्जाविषयी संस्थेने या कार्यालयात दाखल केलेल्या दि.२०/०८/२०२५ रोजीच्या अर्जाबाबत तुमचे म्हणणे दाखल करण्यासाठी या कार्यालयात वेळोवेळी विहित कार्यपद्धतीने नोटीसा पाठवून सुनावण्या घेण्यात आल्या परंतु जाब देणार प्रतिवादी कर्जदार व जामिनदार यांना नोटीस बजावून देखील सुनावणीस हजर राहिले नाहीत. ज्यांना अद्याप पर्यंतही नोटीसा मिळालेल्या नाहीत अशा कर्जदार/जामिनदार यांना सदर कलम अन्वये व नियमाखाली अंतिमरित्या सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास आपले म्हणणे दाखल करण्यासाठी, अंतिम शेवटची संधी देण्यात येत असून दि. ०३/११/२०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता आपण स्वतः अथवा अधिकृत व्यक्ती/वकीलामार्फत कार्यालयात हजर राहून आपले लेखी म्हणणे सदर करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास आपले काही म्हणणे नाही असे गृहीत धरून अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण गांभीर्याने नोंद घ्यावी.

| अ. क्र. | जाब देण्याचे नाव | अर्ज दाखल दि. | दावा | दावा क्रमांक | जमीनदार क्र.१ | जमीनदार क्र.२ | जमीनदार क्र.३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. खरवड मोहनसिंह नवलसिंह. (कर्जदार)/ श्रीम. भवरीदेवी मोहनसिंह खरवड (सहकर्जदार) | २०/०८/२०२५ | ३३१/२०२५ | रु. ६०,०७,८५१/- | श्री. खरवड विरेंद्रसिंह मोहन सिंह | .... | श्री. तानाजी गणपती धोंगडे |

ही नोटीस आज दि. १३/१०/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

स्थळ : पनवेल
दिनांक : १३/१०/२०२५
जा.क्र. २८३२/२०२५

सही/-
**(भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल यांचे कार्यालय**

## e-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-17/ 25-26 7000037912 | Overhauling of ABB make 220kV & 100kV Circuit Breakers, under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee- Rs. 5000+ GST** | **137.30 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 15.10.2025 to 30.10.2025 up to 11:00 hrs, Opening date:-30.10.2025 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8412050202 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## e-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-18/25-26 7000037724 **...2nd call** | Supply, Erection & commissioning of split air conditioning system at 400kV R.S. Nagothane, 220kV Washala, 100kV Murbad and Shahapur S/stn. under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee: Rs. 500/-+GST.** | Rs. 59.74 Lakhs |

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 15.10.2025 to 27.10.2025 up to 11:00 hrs, Opening date: 27.10.2025 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Panvel**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली श्री. मनोज जगवानी यांचे मालकीची बिनशेती मिळकत आमचे अशिल श्री. नागराज नल्लू यांनी कायम खरेदी खतामार्फत विकत घेण्याचे ठरविले आहे, तरी सदर मिळकती संदर्भात कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक इत्यादी यांना गहाण, दान, बक्षीस, किंवा लीन किंवा इतर कोणताही बोजा किंवा इतर कोणताही हक्क, अधिकार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर योग्य त्या पुराव्यानिशी संपर्क साधावा व लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल निम्न उल्लेखित मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट**

तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, दुय्यम निबंधक कर्जत, बोरिवली ग्रामपंचायत हद्दीतील मौजे नालधे, सर्व्हे क्रमांक- ३७, हिस्सा क्रमांक-८, क्षेत्रफळ ०१ हे- ५१ आर-००प्रति पैकी विकत देण्यात येणारे क्षेत्र ०१ हे- ५१ आर -०० प्रति, भोगवटादार वर्ग क्रमांक १ ची जमीन मिळकत.

**कुमारी सुप्रिया शशिकांत विचारे,**
कायदेशीर सल्लागार,
U-७० अक्षर बिझनेस पार्क सेक्टर १९f,
वाशी-तुर्भे रोड नवी मुंबई ४००७०३
मोबाईल नंबर - ९१६७०८२६०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनांच्या मिळकतीं आहेत, या मिळकतींचे मालक रमेश केसरीमल बाफना यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सिटी सर्व्हे क्रमांक / नगर भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|
| ४८/२+४८/३ | ११६.२० |
| १८४ | १०. |
| वरील सिटी सर्व्हे मिळकतींसह कर्जत नगरपरिषदेंतील मालमत्ता क्रमांक १०००२३ (१८/१९, १८/१९/१) | |

सबब सदर वर वर्णन केलेली सिटी सर्व्हे मिळकतीं व वरील नगरपरिषदेतील दप्तरी नमुद मालमत्ता क्रमांकाच्या मालमत्तांच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १६ ऑक्टोबर २०२५

**ॲड.शरद आर. सावंत**
बी. कॉम. एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ.हौ.सो.लि.कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड -. ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री. मोहम्मद अतीक शेख यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत त्यांचे मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|---|
| श्री.अरशद सिकंदर मस्ते व इतर | १ | १३१ | ९/अ/७ | २-०३-०० | २०-३० |
| | २ | १३१ | ९/अ/८ | २-०३-०० | २०-३० |
| | ३ | १३१ | ९/अ/९ | २-०३-०० | २०-३० |

सदरील बिनशेती जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क व अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत तद्‌गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : नेरळ
दि. १५/१०/२०२५

खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
सही/-
**ॲड. साकीब अशरफ पानसरे**
ऑफीस शॉप नं.३८, पहीला मजला, बी-विंग,
तुलसी सेंटर पॉईंट, रेल्वे स्टेशन जवळ, खांडा,
नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
मो. ८०८७७७०५२५/९०११५००२३५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मंगल सुरेश पवार व इतर रा.मु.मायणी, पो.रानसई ता.पेण.जि.रायगड हे येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी मी स्वत: आशुतोष किशनलाल बीयानी रा.६०६ जीवन विहार,५, मानव मंदिर रोड, मलाबार हिल, मुंबई महाराष्ट्र ४००००६ विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| शेडाशी कातकरी वाडी | मंगल सुरेश पवार व इतर | १८ | १२ | ०.२८.०० | ०.१८ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वता: कायमस्वरूपी विकत घेत आहोत. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. १६/१०/२०२५

**आशुतोष किशनलाल बीयानी**
रा.६०६ जीवन विहार,५, मानव मंदिर रोड
मलाबार हिल मुंबई-महाराष्ट्र ४००००६
मो.९००४६०००४६

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम)**

सादर सेवा

**निविदा अधिसूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वेच्या हद्दीत करंजाडी स्टेशन येथे एसएसई/सीॲंडडब्ल्यू साठी स्टोअर रूम बांधकाम आणि रत्नागिरी विभागातील चिपळूण स्टेशनवरील प्लॅटफॉर्म क्र. 1 वर पार्सल कार्यालयाचे बांधकाम करणे. **निविदा अधिसूचना क्रमांक : केआर-आरएन-डिव्हायसीईडब्ल्यू-एसआरपीओ-2025-31 दिनांक: 16/10/2025**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 6,77,123.58/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 23/10/2025, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 06/11/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** मानसून सहित 4 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे.नडोदे ता.खालापुर जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे.नडोदे ता. खालापुर जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | गट नं | हिस्सा नं | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. ज्योती मनहर खडावाला<br>२. सुनिल मनहर खडावाला<br>३. स्मिता निलेश देसाई | २२ | | एकुण क्षेत्र २-७९-०० हे.आर.पॉ यापैकी विक्री करणार यांचे मालकीचे संपुर्ण क्षेत्र ०-४०-०० | १-५८ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज , बक्षिस, वहिवाट, इजमेंट, बोजा तारण वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक १६/१०/२०२५
मो.नं.८००७५३७६५६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट.
**ॲड. महेश कमलाकर थोरवे**
रा. कर्जत ता. कर्जत जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली श्री.संजय गजानन म्हसे आणि इतर यांचे मालकीची बिनशेती मिळकत आमचे अशिल ब्लूचिप लँडहोल्डिंग्ज तर्फे श्री.नागराज नल्लू यांनी कायम खरेदी खता मार्फत विकत घेण्याचे ठरविले आहे, तरी सदर मिळकती संदर्भात कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक इत्यादी यांना गहाण, दान, बक्षीस, किंवा लीन किंवा इतर कोणताही बोजा किंवा इतर कोणताही हक्क, अधिकार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर योग्य त्या पुराव्यानिशी संपर्क साधावा व लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल निम्न उल्लेखित मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट**

तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, दुय्यम निबंधक कर्जत, वारे ग्रामपंचायत हद्दीतील मौजे वारे, सर्व्हे क्रमांक- ८४, हिस्सा क्रमांक-२, आणि सर्व्हे क्रमांक-८४, हिस्सा क्रमांक-३ मधील प्लॉट क्रमांक -१-१६८ त्यात १६२ आणि १६३ वगळता विकत देण्यात येणारे सर्व्हे क्रमांक-८४, हिस्सा क्रमांक-२, आणि सर्व्हे क्रमांक- ८४, हिस्सा क्रमांक-३ मधील प्लॉट क्रमांक-१-१६८ त्यात १६२ आणि १६३ वगळता भोगवटादार वर्ग क्रमांक १ ची जमीन मिळकत.

**कुमारी सुप्रिया शशिकांत विचारे,**
कायदेशीर सल्लागार,
U-७० अक्षर बिझनेस पार्क सेक्टर १९f,
वाशी-तुर्भे रोड नवी मुंबई ४००७०३
मोबाईल नंबर - ९१६७०८२६०७

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे तांबडी, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक सरीता वसंत शिंदे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ.स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे तांबडी, ता. रोहा, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| तांबडी ता.रोहा | १४८ | क्षेत्र ०-९४-९० पो.ख. ०-०५-३० एकुण क्षेत्र १-००-२० | १०.७५ |

दिनांक : १४/१०/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुंद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे वाकणगांव ता.सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत.**

| जमिन मालकाची नांवे | गट/स.नं. | क्षेत्र हे आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.सचिन आत्माराम ठाकुर. खाते नं. ३२० | १०७ | ०-४०-०० | ०-१२ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन दहा दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक : १६/१०/२०२५
खरेदी घेणार
**श्री.संजय धर्मा घरत.**
रा. फ्लॅट नं ३०१, ओएनजीसी कॉलनी,
११४ काळुंद्रे, कोल्खे, रायगड, ४१०२२१
मो. ७०४५५०२२९८

खरेदीदारांचे लेखक
**श्री.राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं ७
पाली ता.सुधागड, जि.रायगड.
मो.९४२११६८७६३/९२७०३६७२९०

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री.जितेंद्र विष्णु आठवले, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १६ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड**


| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नागांव ता.अलिबाग | २१७३ | ०-१०-०० | १.६९ |

दिनांक: १५/१०/२०२५
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा.९७६७०१०९०२


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# निवडक

## महाराष्ट्राचे नेतृत्व सचिन धसकडे

**पुणे :** बीसीसीआयच्या २३ वर्षांखालील गटाच्या कर्नल सी. के. नायडू करंडक क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाचे नेतृत्व सचिन धसकडे सोपविण्यात आले आहे. या स्पर्धेत महाराष्ट्राचा एलिट 'क' गटात समावेश असून महाराष्ट्रासह सौराष्ट्र, तमिळनाडू, मध्य प्रदेश,



त्रिपुरा, पुडुचेरी, आंध्र प्रदेश आणि दिल्ली या संघाचा समावेश आहे. या स्पर्धेत सलामीच्या लढतीत महाराष्ट्राचा सामना सौराष्ट्राशी १६ ते १९ ऑक्टोबर दरम्यान नाशिक येथील गोल्फ मैदानावर होईल. तमिळनाडूविरुद्ध दुसरा सामना २६ ते २९ ऑक्टोबर दरम्यान डेक्कन जिमखाना मैदान, मध्य प्रदेशविरुद्ध तिसरा सामना (२ ते ५ नोव्हेंबर) इंदोर येथील द डेली कॉलेज मैदान, त्रिपुराविरुद्ध चौथा सामना (२३ ते २६ जानेवारी २०२६) दरम्यान गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेटच्या संघटनेच्या क्रमांक दोनच्या मैदानावर. पुडुचेरीविरुद्ध पाचवा सामना (३० जानेवारी ते २ फेब्रुवारी) दरम्यान डेक्कन जिमखाना मैदानावर, आंध्र प्रदेश विरुद्ध सहावा सामना (६ ते ९ फेब्रुवारी) मंगलगिरी आणि सातवा व अखेरचा साखळी सामना दिल्लीविरुद्ध (१३ ते १६ फेब्रुवारी ) नवी दिल्लीतील अरुण जेटली मैदानावर होणार आहे.

## टेबल टेनिस स्पर्धा उत्साहात



**पनवेल :** लायन्स क्लब ऑफ पनवेल व नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन सिडको समाज मंदिर दुसरा मजला सेक्टर १८ नवीन पनवेल येथे महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते संजय सुदाम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत मती मंद व दिव्यांग व आदिवासी टेबल टेनिस खेळाडू विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन शनिवार (दि. ११) ऑक्टोबर रोजी संजीव सूर्यवंशी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सदर प्रसंगी सुरभी पेंडसे, राजेंद्र जेसवानी, नागेश देशमाने, मदन गोवारी, चव्हाण, गौतम म्हस्के, भावना राजेंद्र जेसवानी, अमीत पोद्दार तसेच अनेक सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कॅरम स्पर्धेत 'दिवे'ची आगेकूच

**मुंबई :** महाराष्ट्र कॅरम असोसिएशन आयोजित मलबेरी कॉटेज, महाबळेश्वर येथे सुरू असलेल्या स्पर्धेत पुरुष एकेरीच्या चौथ्या फेरीत जळगावच्या संदीप दिवेने पुण्याच्या रहीम खानचा



१९-१६, २५-८ असा सहज फडशा पाडून पाचव्या फेरीत प्रवेश केला, तर रत्नागिरीच्या अभिषेक चव्हाणने मुंबई उपनगरच्या जितेश कदमला २५-१, २५-७ असे पराभूत केले.

पुरुष एकेरी चौथ्या फेरीचे इतर निकाल

गिरीश तांबे (मुंबई) वि. वि. गणेश तावरे (पुणे) १७-१६, २५-२. महम्मद घुफ्रान (मुंबई) वि. वि. सागर भोसले (पुणे) २५-८, १९-२२, २५-३. सिद्धांत वडवलकर (मुंबई) वि. वि. निलांश चिपळूणकर (मुंबई) २५-१०, २५-१९. अभिषेक चव्हाण (रत्नागिरी) वि. वि. जितेश कदम (मुंबई उपनगर) २५-१, २५-७ विजेते ठरले आहेत.

## अफगाणिस्तानने रचला इतिहास

**अबुधाबी :** हशमतुल्लाह शाहिदीच्या नेतृत्वाखाली अफगाणिस्तानने तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात बांगलादेशला २०० धावांनी पराभूत करुन इतिहास रचला. हा अफगाणिस्तानचा वनडे क्रिकेटमधील दुसरा सर्वात मोठा विजय आहे. अबुधाबीच्या शेख झायेद स्टेडियमवर हा वनडे इतिहासातील सर्वात मोठा विजय ठरला. अशाप्रकारे अफगाणिस्तान



संघानं दक्षिण आफ्रिकेचा विक्रम मोडला. यापूर्वी, २०२४ मध्ये दक्षिण आफ्रिकेने आयर्लंडला १७४ धावांनी पराभूत केलं होतं. या मैदानावर ५६ वनडे सामने खेळले गेले आहेत, परंतु अफगाणिस्तानं बांगलादेशला २०० धावांनी पराभूत करुन एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. अफगाणिस्तानने सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि कठीण खेळपट्टीवर २९३ धावा केल्या. इब्राहिमने संघासाठी शानदार फलंदाजी केली. तर बांगलादेशनं टी-२० मालिकेत अफगाणिस्तानचा ३-० असा क्लीन स्वीप केला होता.

## सूर्यवंशीची रणजीत स्फोटक फलंदाजी

**नवी दिल्ली :** १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने रणजी करंडक स्पर्धेत बिहार संघाचा उप कर्णधार म्हणून पहिलाच सामना खेळला. अरुणाचल प्रदेशविरुद्धच्या या लढतीत वैभवने पहिल्या चार चेंडूंत दोन चौकार व एक षटकार खेचून इरादा दाखवून दिला. त्याने ५ चेंडूंत २८०च्या स्ट्राईक रेटने १४ धावा केल्या. याब नियाच्या पाचव्या चेंडूवर यशस्वीचा त्रिफळा उडाला. अरुणाचल प्रदेशचा पहिला डाव १०५ धावांवर गुंडाळल्यानंतर बिहारने पहिल्या दिवशी २ बाद २८३ धावा करताना १७८ धावांची आघाडी घेतली आहे..सूर्यवंशीचा सलामीचा जोडीदार अर्णव किशोरने ७० चेंडूंत ९ चौकार व १ षटकारासह ५२ धावांची खेळी केली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या आयुष लोहरुकाने १६३ चेंडूंत २६ चौकार व १ षटकारासह नाबाद १५५ धावा केल्या आहेत आणि त्याच्यासोबतीला कर्णधार एस गानी ५६ धावांवर खेळत आहे.

# रणजी सामन्यात महाराष्ट्र संकटात

## ५ फलंदाज शून्यावर बाद; सक्सेना-ऋतुराजने डाव सावरला

**| मुंबई | प्रतिनिधी |**

महाराष्ट्राचा पहिला सामना केरळविरुद्ध खेळत आहे. तिरुवनंतपुरम इथं खेळल्या जाणाऱ्या या सामन्यात केरळनं नाणेफेक जिंकून महाराष्ट्राला प्रथम फलंदाजी करण्यास सांगितले. या निर्णयाचा फायदा झाला, कारण महाराष्ट्राची फलंदाजी सुरुवात होण्यापूर्वीच कोसळल्याचे दिसून आले. दोन षटकांनंतर पाच फलंदाजांना आपले खाते उघडता आले नाही, यावरुन तुम्ही त्यांच्या खराब फलंदाजी कामगिरीचा अंदाज घेऊ शकता.

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की फक्त दोन षटकांत पाच फलंदाज कसे फलंदाजी करु शकले? हे विकेट पडण्याच्या मालिकेमुळे झाले. डावाच्या पहिल्याच षटकात महाराष्ट्राला दोन मोठे धक्के बसले.



प्रथम पृथ्वी शॉ बाद झाला आणि नंतर सिद्धेश वीरही आउट झाला. दोन्ही फलंदाज धावा काढण्यात अपयशी ठरले. नंतर डावाच्या दुसऱ्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर महाराष्ट्राची आणखी एक विकेट पडली. यावेळी बाद झालेला फलंदाज अर्शीन कुलकर्णी होता. मनोरंजक म्हणजे, पहिल्या दोन फलंदाजांप्रमाणे तोही धावा काढण्यात अपयशी ठरला. याचा अर्थ असा की केरळविरुद्धच्या पहिल्या डावात महाराष्ट्राचा वरचा क्रम फक्त सात चेंडू टिकला.

### टॉप फलंदाज शुन्यावर बाद

**महाराष्ट्राच्या डावातील दुसरा षटकही विकेट-मेडन होता. दोन षटकांनंतर पाच फलंदाज मैदानात आले आणि स्कोअरबोर्डवर शून्य धावा लिहिल्या गेल्या. याचा अर्थ असा की पहिल्या दोन षटकांनंतर पाच फलंदाजांपैकी कोणीही धावा काढल्या नाहीत. यातील तीन फलंदाज शून्य धावांवर बाद झाले.**

केरळविरुद्धच्या तिसऱ्या षटकात महाराष्ट्राच्या स्कोअरबोर्डवर धावा दिसल्या. या धावा ऋतुराज गायकवाडनं केल्या, परंतु चौथ्या षटकात आणखी एक बळी पडला. यावेळी बाद झालेला फलंदाज महाराष्ट्राचा कर्णधार अंकित बावणे होता, जो त्याच्या पहिल्या तीन सहकाऱ्यांप्रमाणे खातंही न उघडता बाद झाला. चौथ्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर अंकित बाद झाला तेव्हा महाराष्ट्राचा स्कोअर ४ विकेटवर फक्त ५ धावा होता.

कर्णधार बाद झाल्यानंतर सौरभ नवले फलंदाजीला आला. त्यानं ऋतुराज गायकवाडला साथ देण्याचा प्रयत्न केला. त्यानं २३ चेंडूत १२ धावा केल्या, ज्यात एक चौकार आणि एक षटकार होता. पण चौथी विकेट पडल्यानंतर त्याचा डावही सहा षटकांत संपला, तो ११ व्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर आउट झाला. अशाप्रकारे, महाराष्ट्राला फक्त १८ धावांत पाच मोठे धक्के बसले. मात्र यानंतर जलज सक्सेना आणि ऋतुराज गायकवाड यांनी अर्धशतकी भागीदारी करत संघाचा डाव सावरला.

## 'केप व्हर्डे' देश विश्वचषकासाठी पात्र

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

फुटबॉलच्या मैदानात एक अत्यंत रोमहर्षक इतिहास नुकताच रचला गेला आहे. आफ्रिका खंडातील एल छोटासा देश केप व्हर्डे याने त्यांच्या फुटबॉल कारकिर्दीतील सर्वात मोठी झेप घेतली आहे. या देशाच्या संघाला त्यांच्या प्रयत्नांचे फळ म्हणून पहिले-वहिले फिफा विश्वचषक तिकीट मिळाले आहे.



आफ्रिकन पात्रता फेरीतील निर्णायक सामन्यात केप व्हर्डेने एस्वातिनी संघाचा ३-० असा एकतर्फी पराभव केला आणि कोट्यवधी फुटबॉलप्रेमींचे लक्ष वेधले. विजयानंतर या लहानशा देशात अक्षरशः आनंदाचा महापूर उसळला.केवळ सहा लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या या बेट राष्ट्राने विश्वचषकासारख्या फुटबॉलच्या सर्वात मोठ्या मंचावर पात्र होणारा जगातील दुसरा सर्वात लहान देश होण्याचा अविश्वसनीय मान पटकावला आहे. यापूर्वी, २०१८ च्या रशिया विश्वचषकात खेळलेला आईसलँड हाच एकमेव देश आहे, ज्याची लोकसंख्या केप व्हर्डेपेक्षा कमी आहे.

साधनसंपत्ती आणि लोकसंख्या कमी असतानाही, केवळ जिद्द, मेहनत आणि खेळाप्रतीचे निस्सीम प्रेम या बळावर त्यांनी हा जागतिक विक्रम स्थापित केला आहे, हे विशेष. सामन्यात केप व्हर्डे आणि एस्वातिनी या दोन्ही संघांमध्ये सुरुवातीला कमालीची चुरस दिसून आली.

पहिल्या सत्रात गोल करण्यासाठी दोन्ही संघांना यश आले नाही, त्यामुळे सामन्यात डेडलॉकची स्थिती कायम राहिली. मात्र, दुसऱ्या सत्रात केप व्हर्डेच्या खेळाडूंनी सामन्याची सूत्रे पूर्णपणे हाती घेतली. अवघ्या तीन मिनिटांच्या आत डायलॉन लिव्हरामेंटो याने पहिला गोल करून हा डेडलॉक तोडला आणि संघाला बहुप्रतिक्षित आघाडी मिळवून दिली.

या गोलने संपूर्ण संघात उत्साह संचारला. पहिला गोल होताच लगेचच विली सेमेडो याने अप्रतिम खेळ दाखवत दुसरा गोल केला आणि संघाची आघाडी दुप्पट केली, ज्यामुळे विजयावरची त्यांची पकड मजबूत झाली. त्यानंतर सामना संपत असताना अतिरिक्त वेळेत बदली खेळाडू म्हणून मैदानात उतरलेल्या स्टोपिराने तिसरा आणि निर्णायक गोल डागून विजयावर शिक्कामोर्तब केले.

## तीर्थ ठक्करचा एकहाती विजय

**| मुंबई | प्रतिनिधी |**

को-ऑपरेटीव्ह बँक एम्प्लॉईज युनियन मुंबई आयोजित कोकण कप विनाशुल्क निवड चाचणी शालेय कॅरम स्पर्धेच्या अंतिम पाचव्या टप्प्यात ठाकूर रामनारायण स्कूल-दहिसरच्या तीर्थ ठक्करने अप्रतिम कामगिरी करत अजिंक्यपदावर आपले नाव कोरले. तिने अंतिम फेरीत कनोसा हायस्कूलच्या वेदिका पोमेंडकरवर १५-६ असा प्रभावी विजय मिळवून सिबिईयुएम चषक जिंकला.

स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच तीर्थने आपल्या अचूक निशाण्यांनी आघाडी घेतली होती. प्रारंभीचे काही बोर्ड हातचे निसटल्याने दबावाखाली खेळणाऱ्या वेदिकाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. पाच टप्प्यातील या निवड चाचणीतून निवडलेले सब-ज्युनियर कॅरमपटू कोकण कप सुपर लीग विनाशुल्क कॅरम स्पर्धेत २५ ऑक्टोबरपासून सहभागी होणार आहेत.

दादर-पश्चिम येथील सिबिईयुएम सभागृहात पार पडलेल्या उपांत्य फेरीत वेदिका पोमेंडकरने अनुभवी खेळ दाखवत फक्त ८ वर्षीय केवल कुळकर्णीचे आव्हान संपविले. स्व. दीपक नाईक स्मृती विशेष पुरस्कार पटकाविणाऱ्या केवलचा अंतिम फेरीतील प्रवास थोडक्यात थांबला. दुसऱ्या उपांत्य फेरीत तीर्थ ठक्करने मन्न भलालाला पराभूत करत अंतिम फेरी गाठली होती.

स्पर्धेमध्ये उत्तेजनार्थ पुरस्कार विजेत्यांमध्ये विराज बर्वे, शिवांश मोरे, ओम सुरते, रविराज गायकवाड यांचा समावेश होता. यावेळी प्रमोद पार्टे, लीलाधर चव्हाण यांच्या उपस्थितीत विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

## भारताचे उपांत्य फेरीतील स्थान धोक्यात

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतानी महिला संघाला ३३० धावा केल्यानंतरही ऑस्ट्रेलियाकडून पराभवाची झळ सोसावी लागली. सलग दोन पराभवांमुळे भारतानी महिला संघाचे विश्वचषकातील उपांत्य फेरीमधील स्थान संकटात आले आहे. ऑस्ट्रेलियन कर्णधार एलिसा हिलीच्या १४२ धावांच्या धडाकेबाज खेळीने भारताचे ३३१ धावांचे आव्हान सहा चेंडू आणि तीन विकेट राखून सहज पार पाडले. हा महिला क्रिकेटमधील सर्वात मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग ठरला आहे. भारताने स्मृती मानधना (८०) आणि प्रतिका रावल (७५) यांच्या १५५ धावांची दमदार भागीदारामुळे त्रिशतकी टप्पा गाठता आला. पण शेवटच्या सहा विकेट्स फक्त ३६ धावांत गमावल्याने संघाचा आकडा ३३० वर थांबला.



या धावांना ऑस्ट्रेलियन कर्णधार एलिसाने जोरदार उत्तर दिले. तिने १०७ चेंडूंत १४२ धावा ठोकत भारताच्या आव्हानातील हवा काढली. ३२ धावांवर जखमी निवृत्त झालेल्या एलिस पेरीने शेवटच्या क्षणी पुन्हा मैदानात उतरत ऑस्ट्रेलियाच्या विक्रमी विजयावर ४९ व्या षटकांत शिक्कामोर्तब केले. पेरीने किम गार्थबरोबर २८ धावांची भागी रचत संघाला संस्मरणीय विजय मिळवून दिला. भारताच्या या पराभवामुळे भारताच्या सेमीफायनलच्या शक्यता धूसर झाल्या असून इंग्लंड, न्यूझीलंड आणि बांगलादेशविरुद्धचेउर्वरित सर्व सामने जिंकणे गरजेचे ठरणार आहे.

## आयर्नमॅन स्पर्धेत वानखडे विजयी

**अमरावती :** जगातील प्रतिष्ठित आणि कठीण म्हणून प्रसिद्ध असलेल्या 'आयर्नमॅन' स्पर्धेत अमरावतीचे सुपुत्र डॉ. विश्वजीत वानखडे यांनी उल्लेखनीय यश मिळवून भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला. डॉ. वानखडे यांच्या या पराक्रमाने अमरावतीचा लौकिक जगभर पोहोचला आहे.आयर्नमॅन स्पर्धा ही केवळ शारीरिक क्षमतेची नाही तर मानसिक सहनशक्ती, शिस्त आणि आत्मविश्वाची खरी परीक्षा मानली जाते. इटलीमध्ये झालेल्या आयर्नमॅनस्पर्धेसाठी जगातील तब्बल ७५ देशातील सुमारे ६,००० खेळाडू सहभागी झाले होते. या खेळांडूमध्ये अमरावतीच्या डॉ विश्वजीत वानखडे यांनी अद्वितीय कामगिरीची चमक सादर केली.आयर्नमॅन ही जगातील सर्वात कठीण ट्रायथलॉन स्पर्धांपैकी एक आहे.

## भारतीय संघ ऑस्ट्रेलियाला रवाना

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**


भारतीय क्रिकेट संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी नवी दिल्लीहून रवाना झाला. या दौऱ्यात भारत तीन एकदिवसीय आणि पाच टी२० आंतरराष्ट्रीय सामने खेळणार आहे. विशेष म्हणजे, या दौऱ्यातून फलंदाजीतील अनुभवी खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करत आहेत. या दौऱ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे शुभमन गिल नवीन कर्णधार म्हणून एकदिवसीय संघाचे नेतृत्व करणार आहे. एकदिवसीय मालिका रविवारी पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवर सुरू होईल, त्यानंतर २३ आणि २५ ऑक्टोबरला पुढील सामने होतील. टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका २९ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर दरम्यान खेळवली जाईल.



ऑस्ट्रेलियाच्या एकदिवसीय संघात शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), अक्षर पटेल, केएल राहुल (यष्टीरक्षक), नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, हर्षित राणा, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग, प्रसिद्ध कृष्णा, ध्रुव जुरेल (व्हीके) आणि यशस्वी जयस्वाल यांचा समावेश आहे. तर, टी-२० संघात सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, शुभमन गिल (उपकर्णधार), तिलक वर्मा, नितीश कुमार रेड्डी, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), वरुण चक्रवर्ती, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, संजू सिंह, संजू सिंह, हर्सन सिंह, आर. वॉशिंग्टन सुंदरचा समावेश आहे.

### सामना ३-३ असा बरोबरी सुटला | गुणतालिकेत भारत दुसऱ्या स्थानावर

## भारत-पाकिस्तान खेळाडूंमध्ये हस्तांदोलन



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव कमी होत नसल्याचे चित्र आहे. पहलगाम हल्ल्यानंतर संबंध बिघडले असून क्रीडा क्षेत्रावरही परिणाम झाला आहे. सुलतान ऑफ जोहोर कप हॉकी स्पर्धेत दोन्ही संघांनी हस्तांदोलन केले, ज्यामुळे चर्चेचा विषय बनला. भारत आणि पाकिस्तान या दोन देशातील तणाव अद्याप कमी झालेला नाही. एकिकडे काही दिवसांपूर्वीच क्रिकेटच्या मैदानातही या दोन देशांच्या संघांमध्ये तणाव स्पष्ट दिसून आला आहे. एप्रिलमध्ये झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशातील संबंध अधिक बिघडले. याचा परिणाम जवळपास सर्वच क्षेत्रांवर पडला असून यात क्रीडा क्षेत्राचाही समावेश आहे. काही दिवसांपूर्वीच आशिया कप २०२५ स्पर्धेत भारतीय पुरुष संघांनी पाकिस्तान संघाशी हस्तांदोलन करणे टाळलं होतं. त्यानंतर महिला वनडे वर्ल्ड कपमध्येही भारत आणि पाकिस्तान संघांमध्ये हस्तांदोलन झाले नव्हते. दरम्यान, हॉकी आशिया कप २०२५ स्पर्धेतही पाकिस्तानचा संघ भारतात आला नव्हता, त्यामुळे सामना झाला नव्हता. पण आता २१ वर्षांखालील होणाऱ्या सुलतान ऑफ जोहोर कप हॉकी स्पर्धेत भारत - पाकिस्तान संघात सामना झाला आणि सामन्यात हस्तांदोलनही झाल्याने सर्वांचे लक्ष वेधले. सुलतान ऑफ जोहोर कप हॉकी स्पर्धा मलेशियामध्ये होत आहे. या स्पर्धेत मंगळवारी भारत आणि पाकिस्तान संघ आमने-सामने होते. हा त्यांचा साखळी फेरीतील प्रत्येकी तिसरा सामना होता. या सामन्यात ३-३ अशी बरोबरी झाली. पहलगाम हल्ल्यानंतर पहिल्यांदाच दोन संघ हॉकीच्या मैदानात आमने-सामने होते. या सामन्यात दोन्ही संघांचे खेळाडू प्रथेप्रमाणे हायफाय आणि हस्तांदोलन करताना दिसले. दोन्ही संघांच्या कर्णधारांनीही नाणेफेकीनंतर हस्तांदोलन केले होते. खरंतर भारताच्या क्रिकेट संघांनी पाकिस्तानची हस्तांदोलन न करण्याचा घेतलेल्या निर्णयानंतर ही गोष्ट अधिक चर्चेत आली. त्यांच्या निर्णयानंतर प्रत्येक खेळातही याचप्रमाणे अनुकरण होईल, अशी अपेक्षा सध्या क्रीडा चाहत्यांची आहे. त्यामुळेच हॉकी संघाकडून करण्यात आलेले हस्तादोलन चर्चेचा विषय ठरला आहे. दरम्यान, या सामन्यात दिग्गज पीआर श्रीजेश प्रशिक्षक असलेल्या भारतीय संघाला सुरुवातीला ०-२ अशी पिछाडी स्वीकारावी लागली होती. पण नंतर भारतीय संघाने अफलातून पुनरागमन करत उत्तरार्धात तीन गोल केले आणि ३-२ अशी आघाडी घेतली. पण सामन्याच्या अखेरीस पाकिस्तानने आणखी एक गोल केल्याने सामना ३-३ असा बरोबरी सुटला, त्यामुळे गुण विभागून मिळाले. दरम्यान सध्या भारत आणि ऑस्ट्रेलिया यांचे दोन विजय आणि एका बरोबरीसह सारखेच गुण आहेत. पण गोलच्या फरकाने ऑस्ट्रेलिया अव्वल क्रमांकावर आहे, तर भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. पाकिस्तान तिसऱ्या क्रमांकावर आहे.

## क्रिकेट विश्वाकडून सैनिकांचा सन्मान

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

९३ व्या भारतीय हवाई दल दिनानिमित्त, भारतीय क्रिकेट विश्वाकडून हवाई दलातील शूर सैनिकांना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. ८ ऑक्टोबर १९३२ रोजी स्थापन करण्यात आलेल्या भारतीय हवाई दलाच्या सेवेला आणि समर्पणाला देशभरातून मान्यता मिळाली आहे. या खास दिवशी, पंतप्रधान नरेंद्र मोदींसह अनेक क्रिकेटपटूंकडून देखील हवाई दलाच्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला आहे. जगातील दिग्गज फलंदाजांपैकी एक असलेल्या मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर २०१० मध्ये हवाई दलाचा मानद ग्रुप कॅप्टन बनला होता, असा सन्मान मिळवणारा तो पहिला खेळाडू ठरला होता. सचिन तेंडुलकरने ङ्गएक्सफ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेयर करण्यात आली आहे. त्यावर त्याने लिहिले की, १.४ अब्जाहून अधिक भारतीयांच्या स्वप्नांना आणि आकांक्षांना पंख देऊन, भारतीय हवाई दल आपल्या राष्ट्राचे धैर्य आणि समर्पणाने रक्षण करते आणि त्याला अधिक उंचीवर पोहोचण्यास मदत देखील करते. सचिन तेंडुलकरने पुढे लिहिले की, भारतीय हवाई दलाचा भाग असल्याचा मला अभिमान आणि सन्मानही वाटतो.

भारतीय क्रिकेट संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी देखील लिहिले की, आपल्या आकाशाच्या रक्षकांना सलाम! गंभीर शिवाय माजी क्रिकेटपटू शिखर धवननेही हवाई दलाच्या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)